नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ७ * * अमरावती * सोमवार, दिनांक ०७ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## धर्मस्थळ मंदिरात महिलांवर रेप

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ६ :

कर्नाटकातील धर्मस्थळ मंदिराच्या प्रशासनाशी संबंधित काही लोकांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. मंदिरात काम करणाऱ्या एका दलित सफाई कामगाराने असा दावा केला आहे की त्यांनी त्यला अनेक महिला आणि मुलींचे मृतदेह जाळण्यास आणि पुरण्यास भाग पाडले. या महिलांवर बलात्कार करून त्यांची हत्या करण्यात आली. न्यू इंडियन एक्सप्रेसमधील एका वृत्तानुसार, माजी सफाई कामगाराने सांगितले की तो १९९८ ते २०१४ दरम्यान मंदिरात काम करत होता. त्याने पुरलेल्या अवशेषांचे फोटो आणि पुरावे पोलिसांना दिले आहेत.

# मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

## बा विठ्ठला... बळीराजाला सुखी व समाधानी ठेव, राज्यावरील संकटे दूर कर

■ वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. ६ :

पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी कैलास दामु उगले, सौ. कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री महोदय यांचा सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन



कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषतः या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे.

शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अथार्ने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला.

यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

### पंतप्रधानांनी दिल्या आषाढी एकादशीच्या शुभेच्छा

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखिल मराठीत आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. "आषाढी एकादशीच्या या पवित्र दिनाच्या मनोभावे शुभेच्छा! आपल्यावर विठ्ठलाचे आशीर्वाद सदैव असेच कायम राहोत हीच विठ्ठलाच्या चरणी आपली प्रार्थना आणि कामना. भगवान विठ्ठल आपल्याला आनंदी आणि समृद्धीमय समाजासाठी मार्गदर्शन करत राहो, आणि आपणही गरीब आणि वंचितांची सेवा करत राहू या", असे त्यांनी ट्विट करत म्हटले आहे.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## जय हरी विठ्ठल!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पंढरपुरात विठ्ठलाची सपत्नीक पूजा केली. त्यांच्यासोबत गेली कित्येक वर्ष वारी करणारे नाशिक मधील उगले दांपत्यसुद्धा मानाचे वारकरी म्हणून उपस्थित होते. या निमित्ताने आपल्या महाराष्ट्राची परंपरा कायम राखली गेली. आज हजारो वारकऱ्यांच्या साक्षीने मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विकासाची आणि सर्वांना सन्मार्गाने जाण्याची मागणी करून आपली पूजा भक्तिभावाने विठ्ठल चरणी समर्पित केली. महाराष्ट्रावर आसमानी आणि सुलतानी अशा प्रकारची अनेक संकटे आहेत. आज आर्थिक दृष्टीने महाराष्ट्र पहिल्यासारखा राहिलेला नाही. महाराष्ट्रावर कर्जाचे ओझे आहे. हे कर्ज फिटेल तेव्हा फिटेल. आज तरी या दृष्टीने कोणताही मार्ग काढण्यासाठी आपल्याजवळ कोणतीही विशेष योजना नाही. याबद्दलही गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. आसमानी आणि सुलतानीचे म्हणाल, तर जेव्हा नको तेव्हा पाऊस भरमसाठ येणे आणि जेव्हा गरज असेल तेव्हा गुप्त होणे. यामुळे शेतकरी बेजार झालेला आहे. महागाईने सामान्य जनतेचे जीणे बेहाल झालेले आहे. आता एकमेव विठ्ठलच आपल्याला न्याय देईल. कारण तोच आपला रखवाला आहे, रक्षणकर्ता आहे. म्हणजेच विठ्ठलाने कोणे एकेकाळी एक पैसाही कर्ज नसलेल्या महाराष्ट्राला त्याच मूळ पथावर घेऊन जावे. संपूर्ण महाराष्ट्राला कर्जमुक्त करून बळीराजाला सौख्याचे दिवस यावेत. इतकीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. कर्ज केवळ महाराष्ट्रावरच आहे असे नाही. संपूर्ण देशावर सुद्धा कर्ज आहे. आपण चकाचक रस्ते बांधलेले आहेत. हजारो लाखो आणि कोट्यावधी रुपये आपण बऱ्याचशा गोष्टीवर खर्च करत आहोत. आता आपण जगात चौथी अर्थव्यवस्था होत आहोत. अशा परिस्थितीतही या देशातील अंदाजे ६० टक्के जनतेला अन्नधान्य शिधापत्रिकेद्वारा जवळपास मोफत द्यावे लागते. ही काही भूषणावह बाब नाही. कटू असली तरी हीच परिस्थिती महाराष्ट्राची आहे. महाराष्ट्रातही आपण अनुत्पादक बाबींवर प्रचंड खर्च करीत आहोत. एकेकाळी मुंबई महानगरात शेकडो कापड गिरण्या होत्या. गिरणगाव म्हणजे त्यावेळच्या मुंबईच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. आज ते सगळे गिरणी कामगार तत्कालीन दत्ता सामंतांसारख्या नेत्यांच्या हट्टाग्रहामुळे बेहाल झालेले दिसतात. अशा परिस्थितीत मुख्यमंत्र्यांनी परंपरागत पद्धतीने विठ्ठलाची महापूजा केलेली आहे. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या भल्यासाठी ज्या ज्या मागण्या केल्या आहेत. त्या त्या मागण्या पंढरपूरच्या पांडुरंगाने म्हणजेच आपल्या विठूरायाने पूर्ण कराव्यात. एवढीच अपेक्षा ठेवून, मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्राच्या भल्यासाठी पांडुरंगाने प्रेरणा द्यावी. अशी अपेक्षा आम्ही मनापासून व्यक्त करतो आणि विठ्ठलाच्या नामाचा जयघोष करतो. विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## झारखंडमध्ये कोळसा खाण कोसळली
# ४ कामगारांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि. ६ :

झारखंडमध्ये शनिवारी मुसळधार पाऊस पडला. रामगड जिल्ह्यातील महुआ टांगरी येथे सकाळी एक बेकायदेशीर कोळसा खाण कोसळली.

या घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले. सोमवार सकाळपर्यंत राज्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

मध्य प्रदेशात जोरदार पावसाची यंत्रणा सक्रिय असल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे मांडला जिल्ह्यात नर्मदा नदी दुथडी भरून वाहत आहे. नरसिंहपूर ते होशंगाबादला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळला. २० जून रोजी हिमाचल प्रदेशात मान्सून दाखल झाला. तेव्हापासून ४ जुलैपर्यंत पूर-भूस्खलनाच्या घटनांमध्ये ७५ जणांचा मृत्यू झाला आहे. २८८ जण जखमी झाले आहेत. ढगफुटीच्या घटनांमध्ये सर्वाधिक १४ जणांचा मृत्यू मंडी जिल्ह्यात झाला आहे. येथे ३१ जण अजूनही बेपत्ता आहेत.

## बिहार क्राईम कॅपिटल बनले : राहुल गांधी

■ वृत्तसंस्था, पटना, दि. ६ :

बिहारची राजधानी पाटणा येथे झालेल्या व्यापारी गोपाल खेमका हत्या प्रकरणावरून राहुल गांधी यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि सत्ताधारी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. त्यांनी म्हटले आहे की दोघांनी मिळून बिहारला भारताची गुन्हेगारीची राजधानी बनवले आहे. राहुल गांधींनी 'एक्स' या सोशल मीडिया हँडलवर हे म्हटले आहे.

राहुल गांधींनी लिहिले - पाटण्यातील व्यापारी गोपाल खेमका यांच्या उघड हत्येमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की भाजप आणि नितीश कुमार यांनी मिळून बिहारला "भारताची गुन्हेगारीची राजधानी" बनवले आहे. आज बिहारमध्ये लूटमार, गोळीबार आणि खून अशा घटना घडत आहेत. येथे गुन्हेगारी 'नवीन सामान्य' बनले आहे - आणि सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. जे सरकार तुमच्या मुलांचे रक्षण करू शकत नाही ते तुमच्या भविष्याची जबाबदारीही घेऊ शकत नाही.




## शेततळ्यात बुडून दोन भावंडाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ६ :

जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील शिरपूर येथे एका शेततळ्यात अंघोळीला गेलेल्या दोन सख्या मावस भावंडाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. विहान ज्ञानेश्वर मडावी(१२, रा. शिरपूर) रुदय मडावी(९, रा. गडचिरोली) अशी मृत भावंडांची नावे आहेत. या घटनेमुळे मडावी कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले असून गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

प्राप्त माहितीनुसार, ६ जुलैरोजी सकाळी दहा वाजताच्या सुमारास विहान आणि रुदय हे दोघेही सुटी असल्याने गावाजवळील शेतात गेले होते. यावेळी शेततळ्यातील पाणी बघून दोघांनाही अंघोळीचा मोह आवरता आला नाही. दरम्यान, तळ्याच्या काठावर सायकल आणि कपडे काढून ठेवत दोघेही पाण्यात उतरले.

परिसरात आठवडाभरापासून जोरदार पाऊस सुरू असल्याने शेततळे भरले होते. त्यामुळे पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही बुडाले. काही वेळानंतर शेतात जाणाऱ्या गावकऱ्यांना काठावर कपडे आणि सायकल दिसून आली. मात्र कुणीही व्यक्ती त्यांना दिसले नाही.



त्यामुळे तळ्याच्या दिशेने पाहणी केली असता दोन लहान मुलांचे मृतदेह तळ्यातील पाण्यावर तरंगताना दिसून आले. त्यांनी सदर घटनेची माहिती लगेच कुरखेडा पोलिसांना दिली.

मृतक विहान मडावी याचे वडील शिक्षक असून तो शिवाजी हायस्कूल कुरखेडा येथे सातव्या वर्गात शिकत होता. तर त्याचा मावस भाऊ रूदय हा गडचिरोली येथे शिकत होता. तो पाहूणा म्हणून शिरपूर येथे मावशीकडे आला होता. त्याचे वडील गडचिरोली पोलीस दलात कार्यरत आहेत. दोन्ही चिमूकल्यांच्या मृत्यूने परीसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

राज्यात जुलैच्या सुरुवाती पासूनच पावसाने दमदार हजेरी लावली आहे. आता बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात पुन्हा एकदा मान्सून सक्रिय झाला असून, अनेक जिल्ह्यांना जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विशेषतः पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यावर (६ जुलै) आणि उद्या (७ जुलै) 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

हवामान खात्याने या भागात २०० मिमी पर्यंत पावसाची शक्यता वर्तवली असून, दरड कोसळण्याचा किंवा पूरसदृश स्थितीचा धोका लक्षात घेऊन स्थानिक प्रशासनांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंना कायदेशीर नोटीस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल नेहमी बेताल वक्तव्य करणाऱ्या व त्यांना शिवराळ भाषेत बोलणाऱ्या लक्ष्मण हाके यांच्या विरोधात कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन संजय यादव यांनी ही नोटीस बजावली असून, हाके यांनी सात दिवसांत अजित पवार यांची लेखी माफी मागावी, अन्यथा न्यायालयात खेचण्याचा इशारा नितीन यादव यांनी दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात वेळोवेळी जाणुनबुजुन बेताल वक्तव्य करणाऱ्या विरोधात कायदेतज्ज्ञ ॲड. शंतनु माळशिकारे यांच्या वतीने नितीन संजय यादव यांनी लक्ष्मण हाके यांना आज नोटीस बजावली. लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांची लेखी माफी न मागितल्यास लक्ष्मण हाके यांना न्यायालयात खेचून दिवाणी, फौजदारी व अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचे नितीन यादव यांनी म्हटले आहे.

## काँग्रेसची मूल्ये स्वीकारणाऱ्यांसोबत काँग्रेस पक्ष पुढे जाईल : हर्षवर्धन सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ६ :

मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे एकाच मंचावर येत त्रिभाषा सूत्र मागे घेतल्याचा जल्लोष साजरा केल्यानंतर राज्याच्या राजकारणात नव्या युतीच्या चर्चांना उधाण आले आहे. यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली असून, "समविचारी पक्ष असतील आणि काँग्रेसच्या मूल्यांना मान्यता देतील, तरच काँग्रेस अशा युतीसोबत पुढे जाईल," असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

शनिवारी मुंबईत झालेल्या विजयी मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले होते. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीची शक्यता राजकीय वतुर्ळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले की, हा मेळावा फक्त मराठी विषयाच्या पार्श्वभूमीवर एकत्र येऊन साजरा केलेला



जल्लोष होता.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी पहिल्यापासूनच एकत्र लढत होती, मात्र भाजपला दूर ठेवण्यासाठी २०१९ मध्ये शिवसेनेने निर्णय घेतला.

चर्चेनंतर महाविकास आघाडी अस्तित्वात आली. भाजपला दूर ठेवण्यासाठी राज्यात आणि देशात इंडिया अलायन्स तयार झाली. त्यावेळी आम्ही विधानसभा लोकसभा दोन्ही निवडणूक एकत्र लढलो. स्थानिक पातळीवर समविचारी पक्षासोबत युती करण्याचे अधिकार स्थानिक नेतृत्वाला दिले आहेत.



# ठाकरे बंधू एकत्र येताच सत्ताधाऱ्यांची रडारड सुरू : संजय राऊत



**मुंबई :** उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या संयुक्त मेळाव्याला मराठी जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यानंतर राज्यातील राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली असून, सत्ताधाऱ्यांच्या प्रतिक्रियांनी वातावरण तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मेळाव्यावर टीका केली. त्याला उत्तर देताना खासदार संजय राऊत यांनी त्यांच्याच शैलीत प्रत्युत्तर दिलं.ठाकरे बंधू एकत्र आले, आणि लगेच सत्ताधाऱ्यांची 'रुदाली' सुरू झाली. आता फडणवीस आणि शिंदे यांनी रडण्याचे कार्यक्रम ठेवावेत, असा उपरोधिक टोला त्यांनी लगावला. संजय राऊत पुढे म्हणाले, जनतेला माहित आहे कोण खरे आणि कोण खोटारडे आहेत. त्यामुळेच लाखोंचा जमाव मेळाव्याला आला. लेखणी आणि वाणीच्या बळावर ठाकरे कुटुंबाने महाराष्ट्रावर आपले अधिराज्य निर्माण केले. यामागे कोणताही दिखावा नाही. ठाकरे बंधू एकत्र आल्यापासून सत्ताधाऱ्यांचे संतुलन बिघडले आहे. त्यांच्या प्रतिक्रियांमधून दिशाभूल दिसून येते. बुद्धी भ्रमित झालेली असल्याचेच हे लक्षण आहे, असे संजय राऊत म्हणाले.वरळी डोम मैदानावरील मेळाव्यानंतर हिंदी सक्तीविरोधात देशभरात चर्चेला उधाण आले आहे.

# महाविकास आघाडी नव्हे तर ठाकरे विकास आघाडी : संजय निरुपम



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनाप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी एकत्र येत विजयी मेळावा आयोजित केला. या मेळाव्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक आले होते. या मेळाव्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी टीका करण्यास सुरुवात केली आहे. त्यात आता संजय निरुपम यांनी देखील ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावर भाष्य केले आहे. महाविकास आघाडी नव्हे तर आता ठाकरे विकास आघाडी तयार झाले, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. संजय निरुपम म्हणाले, काल जे काही झाले, ठाकरे बंधू एकत्र आले आणि महाविकास आघाडीचे जे काही लोक होते ते तिथे सगळे जमले होते. कॉंग्रेस वगळता तो एक नवीन महाविकास आघाडीचा चेहरा होता. महाविकास आघाडी जी आहे ती आता ठाकरे विकास आघाडीमध्ये रूपांतरित झाली आहे. तिथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे लोक, भाकपचे लोक, महादेव जानकर यांच्यासारखे जे लोक उपस्थित होते, त्यांच्या उपस्थितीत आता महाविकास आघाडीचे ठाकरे विकास आघाडी झाले आहे. पुढे बोलताना संजय निरुपम म्हणाले, दोन्ही पक्षांची हालत खराब आहे. राज ठाकरे यांचा जो पक्ष आहे त्याचा आता फक्त 2 टक्के व्होट बँक राहिले आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची स्थिती सुद्धा खराब आहे. जेव्हापासून ते भाजपपासून लांब गेले आहेत.

# धामणी धरणाचे पाच दरवाजे उघडले



**बोईसर :** पालघर जिल्ह्यात आठवडाभरापासून दमदार पावसाने हजेरी लावली आहे. पावसाच्या संततधारेने जिल्ह्यातील धरणांमध्ये पाण्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू आहे. सूर्या प्रकल्पअंतर्गत धामणी धरणात २२८ दशलक्ष घनमीटर (८२ टक्के) पाणीसाठा निर्माण झाला असून धरणातील पाण्याची पातळी स्थिर राखण्यासाठी शुक्रवारी धरणाचे तीन दरवाजे ४० सेंटीमीटरने उघडण्यात येऊन सूर्या नदीपात्रात १४ हजार ३३७ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला होता.

गेल्या दोन दिवसांपासून धरण क्षेत्रात पावसाचा जोर अधिकच वाढला असून मागील २४ तासात २५४ मिमी पाऊस पडला. सूर्या धरण प्रकल्प क्षेत्रात आत्तापर्यंत एकूण १५३० मिमी पावसाची नोंद झाली आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे वेगाने पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे रविवारी सकाळी सूर्या धरणाचे सर्व पाच दरवाजे ४० सेंटीमीटरने उघडण्यात येऊन ४०६१ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

धामणी धरणातून कवडास बंधाऱ्यात येत असलेल्या पाण्यामुळे कवडास बंधारा ४४.७७ टक्के भरला असून बंधाऱ्याच्या सांडव्यावरून सूर्या नदीपात्रात सुमारे ४५००७ क्युसेक प्रति सेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे सूर्या नदीला मोठा पूर आला असून डहाणू आणि पालघर तालुक्यातील दोन्ही काठांवरील वाघाडी, वेती, कासा, वरोती, चारोटी, घोळ, भराड, निकावली, आंबिवली, धामटणे, पेठ, म्हसाड, उर्से, नानिवली, साये आंबिस्ते, आकेगव्हाण, चिंचारे, गारगाव, बोरशेती, किराट, माकडचोळा, लालोंडे, गुंदले, नागझरी, निहे, लोवरे, गिरनोली, सागावे, काटाळे, कोकणेर, मासवन, चहाडे, वसरे, विश्रामपूर, लालठाने, तांदुळवाडी, पारगाव, नावजे, गिराळे या गावांना सतर्कतेचा इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या स्थितीनुसार सूर्या नदीपात्रात करण्यात येणाऱ्या विसर्ग मध्ये कमी अधिक प्रमाणात बदल करण्यात येणार असल्याची माहिती पालघर पाटबंधारे विभागामार्फत देण्यात आली आहे.

# सीए परीक्षांचे निकाल जाहीर

## अंतिम परीक्षेत मुंबईतील राजन काबरा अव्वल

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ :**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाकडून (आयसीएआय) मे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या फाउंडेशन, इंटरमिजीएट आणि अंतिम परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. अंतिम परीक्षेत देशातून मुंबईतील राजन काबरा अव्वल आला आहे. फाऊंडेशन परीक्षेत गाझियाबादमधील वृंदा अगरवाल, आणि इंटरमिजिएट परीक्षेत मुंबईतील दिशा गोखरू ही अव्वल आली आहे.

सीए अंतिम, फाऊंडेशन, इंटरमीडिएट या तिन्ही परीक्षा मे २०२५ रोजी घेण्यात आल्या होत्या. सीए अंतिम, इंटरमीडिएट या परीक्षा देशभरातून ५६४ केंद्रांवर घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेसाठी ग्रुप एक मधून ६६ हजार ९४३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील १४ हजार ९७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण २२.३८ टक्के आहे. तर ग्रुप २ मधून ४६ हजार १७३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.



त्यातील १२ हजार २०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण २६.४३ टक्के आहे. तसेच दोन्ही ग्रुपमधून परीक्षेला बसलेल्या २९ हजार २८६ पैकी ५ हजार ४९० विद्यार्थी उत्तीर्ण असून, उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण १८.७५ टक्के इतके आहे.

या परीक्षेत मुंबईतील राजन काबरा हा ६०० पैकी ५१६ गुण मिळवून देशात अव्वल आला. त्याखालोखाल कोलकाताची निशिता बोथ्रा हिने ५०३ गुण मिळवले तर मुंबईच्या मानव शहा याने ४९३ गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला.

सीए अंतिम परीक्षेपूर्वी सीए इंटरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. आयसीएआयकडून मे २०२५ मध्ये घेतलेल्या या परीक्षेच्या ग्रुप १ मधून ९७ हजार ३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील १४ हजार २३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण १४.६७ टक्के इतके आहे. तसेच ग्रुप २ मधून ७२ हजार ६९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील १५ हजार ५०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण २१.५१ टक्के इतके आहे.

त्याचप्रमाणे दोन्ही ग्रुपमध्ये परीक्षा दिलेल्या ३८ हजार २९ विद्यार्थ्यांपैकी ५ हजार २८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण १३.२२ टक्के इतके आहे. यामध्ये मुंबईतील दिशा गोखरू हिने ६०० पैकी ५१३ गुण मिळवत अव्वल क्रमांक पटकावला. त्याखालोखाल संदीप देविदान याने ५०३ गुण मिळवत दुसरा क्रमांक पटकावला. तसेच जयपूरचा यमिश जैन व उदयपूरचा निलय डांगी याने ५०२ गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला आहे.

सीए फाऊंडेशन ही परीक्षा देशभरातून ५५१ केंद्रांवर घेण्यात आली. या परीक्षेसाठी देशभरातून ८२ हजार ६६२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. मुलांची संख्या ४३ हजार ३८९ आणि मुलींची संख्या ३९ हजार २७३ इतकी होती. परीक्षेला बसलेल्यांपैकी १२ हजार ४७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचे हे प्रमाण १५.०९ टक्के इतके आहे. उत्तीर्ण झालेल्यांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या ७ हजार ५६ इतकी असून, उत्तीर्ण होण्याचे प्रमाण १६.२६ टक्के तर मुलींची संख्या ५ हजार ४१८ इतकी असून, उत्तीर्ण होण्याचे प्रमाण १३.८० इतके आहे. फाऊंडेशन परक्षेमध्ये देशातून गाझियाबादमधील वृंदा अगरवाल ४०० पैकी ३६२ गुण मिळवून अव्वल आली आहे. तसेच मुंबईतील यज्ञेश नारकरने ४४० पैकी ३५९ गुण मिळवत दुसरा क्रमांक पटकावला आहे. ठाण्याचा शार्दुल विचारे याने ३५८ गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला.

# वैजापूर येथील सातशे वर्षांचा प्राचीन एकटा विठोबा नवसाला पावणारा

## पंढरपूरनंतर राज्यातील एकमेव काळ्या पाषाणातील मूर्ती

■ **महासागर प्रतिनिधी**
**वैजापूर, दि. ६ :**

जिल्ह्यातील वैजापूर येथील महाराणा प्रताप रोडवरील ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभलेल्या एकटा विठोबा मंदिर हे शहराचे आराध्य दैवत मानले जाते. या मंदिरात आषाढ शुद्ध एकादशीनिमित्त ता.६ जुलै रोजी श्री मुंजाबा मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळातर्फे करण्यात आले आहे. या विठ्ठल मंदिराचा इतिहास जवळपास सातशे वर्षांपूर्वीचा असून भक्त पुंजाजी नांग यांनी वृद्धापकाळामुळे पंढरपूर वारी न करता वैजापूरमध्येच विठोबाच्या प्रतिमेची स्थापना करून भक्तीचा नवा अध्याय सुरू केला. त्यांच्या या भक्तीतून एकटा विठोबा मंदिराचा उदय झाला. ज्याचे संवर्धन आजतागायत राजापूरकर (जोशी) कुटुंब करत आहे. संत एकनाथ महाराजांच्या सासुरवाडीच्या परंपरेमुळे एकनाथ महाराज देखील काही काळ या मंदिरात मुक्कामी राहिल्याचे सांगितले जाते ज्या जागेवर ते बसले होते, त्या दगडावर ओटा बांधून त्यावर त्यांचे पवित्र पादुका स्थापन करण्यात आल्या. या ओट्यावर दरवर्षी नाथषष्ठी उत्सव साजरा केला जातो. या मंदिराची देखभाल कल्पना चंद्रकांत अकोलकर (राजापूरकर जोशी) गेल्या



बावीस वर्षांपासून सातत्याने करीत असून, त्यांनी या मंदिराच्या सेवा-उपासनेला आपले जीवन समर्पित केले आहे. असा इतिहास, परंपरा आणि भक्तीचा संगम असलेल्या एकटा विठोबा मंदिरात, आषाढी एकादशीच्या दिवशी आयोजित महाप्रसादात सहभागी होऊन भाविकांनी आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन मुंजाबा मित्र मंडळ व लखीचंद मार्केट, वैजापूर यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील कोट्यवधी वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर येथे एकट्या पांडुरंगाची मूर्ती आहे. त्या नंतर वैजापूर येथे एकट्या विठोबाची सातशे वर्षापूर्वीची दुसरी चार फुटांची मुर्ती असल्याची महिती याठिकाणी संयोजन करणा-या मंडळींनी दिली या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी रमेश बोरनारे यांनी गेल्या वर्षात ४० लाखांचा निधी दिला होता.

# महिलांवर अत्याचार झाल्यास आरोपीवर मकोका : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. ६ :**

महिलांवरील वाढत्या अत्याचारांसंदर्भात राज्य सरकार आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मकोका) लावण्याच्या तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा झाली असून, विधी व न्याय विभागाला तपासणी करण्याचे आदेश दिल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी पुण्यातील एका कार्यक्रमात




बोलताना सांगितले.

याबाबत बोलताना पवार म्हणाले, महिलांची सुरक्षा हा प्राधान्याचा विषय आहे. म्हणूनच याबाबत कायदा आणि सुव्यवस्था चांगली रहावी, यासाठी सरकारची भूमिका ही कठोर अशीच आहे. त्यादृष्टीने कायदे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशी प्रकरणे घडल्यानंतर आरोपी, तपास, चौकशी, पुरावे आदी न्यायालयीन प्रक्रियेत खटला सुरूच असतो. तोपर्यंत आरोपीवर मकोकासारखे कलम लावण्यासंदर्भात सरकार चाचपणी करत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सहकारीही सकारात्मक आहेत. त्यामुळे महिला अत्याचाराच्या प्रकरणात या कायद्याची अंमलबजावणी करता येणार का, याबाबत राज्याच्या विधी व न्याय विभागाला सूचना केल्या आहेत, असेही पवार यांनी या वेळी बोलताना सांगितले. कोंढवा येथील घटनेसंदर्भात पोलिसांनी तपास केला. या तपासादरम्यान वेगळ्याच गोष्टी समोर आल्या आहेत. संबंधित तरुण-तरुणी गेल्या अनेक दिवसांपासून मित्र आहेत. ते नियमित एकमेकांना भेटायचे, दोघांमध्ये संभाषण असायचे. तरुणीनेच त्याला फोन करून घरी बोलावले होते, कुठलाही स्प्रे मारला नाही, असे तपासात समोर आले. परंतु, समाजात वेगळीच माहिती गेली असून पोलिस आयुक्तांना पत्रकार परिषद घेऊन वस्तुस्थिती समोर मांडण्याच्या सूचना केल्या आहेत. संबंधित तरुणीने तक्रार करण्याचे कारण काय? याबाबतही तपास करण्याबाबत आदेश दिले आहेत.

## टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील महिलेचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. ६ :**

लोहगाव परिसरात भरधाव टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाला. अपघातात दोन लहान मुले जखमी झाली. रुक्मिणी राजू चव्हाण (वय २९, रा. वडगाव शिंदे रस्ता, लोहगाव ) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. अपघातात चव्हाण यांची दोन लहान मुले जखमी झाले. याबाबत राजू चव्हाण (वय ३३) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार राजू, त्याची पत्नी रुक्मिणी आणि दोन मुले लोहगाव भागातून ४ जुलै रोजी रात्री अकराच्या सुमरास निघाले होते. धानोरी जकात नाक्याजवळ भरधाव टेम्पोने दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी रुक्मिणी आणि त्यांची दोन मुले जखमी झाली. रुक्मिणी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी मुलांसह रुक्मिणी यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उपचारांदरम्यान रुक्मिणी यांचा मृत्यू झाला. मुलांवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अपघातानंतर पसार झालेल्या टेम्पोचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस कर्मचारी वाय. एस. चव्हाण तपास करत आहेत. मुंबई-पुणे रस्त्यावरील पाटील इस्टेट भागात भरधाव मोटारीच्या धडकेत पादचारी ज्येष्ठाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर पसार झालेल्या मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कौटुंबिक वादानंतर महिलेची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ :**

पत्नीशी झालेल्या वादातून ३२ वर्षीय आरोपीने त्याच्या पत्नीची हत्या केल्याची घटना दहिसर पश्चिम येथे घडली. याप्रकरणी एमएचबी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पप्पू मानू राठोड (३२) असे अटक आरोपीचे नाव असून तो दहिसर पश्चिम येथील गणपत पाटील नगर परिसरातील रहिवासी आहे. तो बिगारी काम करून चरितार्थ चालवतो. आरोपीचा त्याच्या पत्नीशी तीन दिवसांपासून वाद सुरू होता.

# आषाढीनिमित्त शेगाव नगरी भाविकांनी फुलली

■ **महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. ६ :**

माझ्या जीवाची आवडी! पंढरपूर नेईन गुढी!! आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरवारीचे महत्त्व ज्ञानेश्वर माऊलींनी या सार्थ शब्दात सांगितले आहे. विठूमाऊलीच्या लाखो भक्तांसाठी आषाढीची वारी म्हणजे व्रत, सर्वात मोठा उत्सव. मात्र प्रापंचिक अडचणी, शारीरिक व्याधी, दुर्बलता, वार्धक्य यामुळे सर्वच वारकऱ्यांना पंढरपूर वारीला जाणे अशक्य ठरते. मग त्यांची पाऊले विदर्भ पंढरी शेगाव नगरीकडे वळतात. गजानन महाराजांमध्येच विठूमाउलीचे रूप पाहणारे हजारो



भाविक मग संतनगरी शेगावात दाखल होतात.

यंदाची आषाढीदेखील या परंपरेला अपवाद ठरली नाही. शेगाव नगरीत आज रविवारी, ६ जुलै रोजी शेकडो दिंड्यासह पाऊण लाख भाविकांची मांदियाळी जमल्याचे दिसून आले. यामुळे संत गजानन महाराज मंदिर परिसर, मंदिराकडे येणारे विविध मार्ग भाविकांनी नुसते फुलून गेल्याचे दिसून आले. आषाढी एकादशी निमित्त राज्यातूनच नव्हे तर शेजारील मध्य प्रदेश गुजरात मधून आबालावृद्ध भाविक शेगावात दाखल झाले आहे. हजारो परिवार श्रींच्या दर्शनासाठी आल्याचे दिसून आले.

भाविकांची तोबा गर्दी व सुविधा लक्षात घेऊन शनिवारी, ५ जुलैला रात्रभर मंदिर दर्शनसाठी खुले ठेवण्यात आले होते. काल रात्री दर्शनसाठी १ तास लागत होता. मात्र रात्रभर मंदिर सुरु असतानाही आज रविवारी दर्शनसाठी दीर्घ रांगा लागल्याचे दिसून आले. आज सकाळी थेट दर्शनसाठी २ तास तर माध्यान्ह नंतर ३ ते ३.३० तास लागत होता. दूरवरच्या भाविकांचा ओघ सुरूच असल्याने आज रविवारी दिवसभर मंदिर सुरु ठेवण्यात आले आज सकाळपासूनच आषाढी एकादशीनिमित्त शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यामध्ये पहाटे मंदिरामध्ये काकडा भजन दुपारी प्रवचन पार पडले. दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण व्यवस्था करण्यात आली.

# शेगावची गायत्री मिस एशिया वर्ल्ड २०२५

■ **महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. ६ :**

विदर्भपंढरी शेगावचे नाव पुढे आल्यावर संत गजानन महाराज संस्थान, वर्षभर साजरे होणारे उत्सव डोळ्यासमोर येतात. एक प्रकारे शेगाव म्हणजे अध्यात्म नगरी ठरली आहे. मात्र नुकतेच आखाती राष्ट्रातील दुबई येथील एका स्पर्धेत शेगावचा गवगवा झाला. संतनगरीच्या युवतीने तिथे शेगावचा नव्हे महाराष्ट्र अन देशाचाही नांवलौकिक वाढविला. ती मिस आशिया वर्ल्ड २०२५ ची मानकरी ठरली. यामुळे शेगाव नगरी सध्या आषाढी एकादशी सोहळ्याने आनंदाने न्हाऊन निघाली असतानाच शेगावकर कन्येच्या यशाचा देखील जल्लोष साजरा करीत आहे.

साधारण परिवारातील युवतीने शिक्षणानंतर वेगळीच वाट चोखाळली.



अनिश्चित अश्या सौन्दर्यस्पर्धा, मॉडेलिंग च्या क्षेत्राकडे ती वळली. खडतर संघर्ष, परिश्रम करीत तिने या क्षेत्रात आता नावलौकिक मिळविला

नुकतेच गायत्री रोहनकर हिने ब्रिस्टोल हॉटेल देरा, दुबई येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय सौंदर्यस्पर्धेत मिस एशिया वर्ल्ड २०२५ हा किताब पटकावला आहे. या यशामुळे गायत्रीने केवळ शेगावचेच नाही, तर संपूर्ण भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे.

या स्पर्धेत आशियातील विविध देशांतील ४० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. विविध फेऱ्यांमधून पारख करण्यात आलेल्या स्पर्धकांमध्ये गायत्रीने आपली बुद्धिमत्ता, सौंदर्य, सामाजिक भान आणि संवादकौशल्य यांमुळे परीक्षकांची मने जिंकली. स्पर्धेतील अंतिम फेरीत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गायत्री म्हणाली, आधुनिक युगात सौंदर्य ही फक्त देखाव्यापुरती गोष्ट नसून, ती एक जबाबदारी आहे. सौंदर्य म्हणजे दुसऱ्याच्या आयुष्यात आशा निर्माण करणारी प्रेरणा. तिच्या या विचारशील उत्तराने संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले आणि एकमताने तिला मिस एशिया वर्ल्डचा किताब बहाल केला.

# गोसेखुर्द धरणाचे २७ दरवाजे उघडले

■ **महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. ६ :**

गोसेखुर्द धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित करण्याच्या उद्देशाने शनिवारी धरणाची २७ वक्रदारे उघडण्यात आली आहे. याद्वारे ३,०४४.३३ क्युमेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. या पाण्याच्या प्रवाहात धरणाच्या दोन्ही जलविद्युत प्रकल्पांमधून सोडण्यात येणारे पाणी देखील समाविष्ट आहे. धरणातील वाढलेला पाणीसाठा आणि धापेवारा धरणातून होणारा पाणीसाठा पाहता, काही तासांत गोसेखुर्द प्रकल्पातून सोडण्यात येणारे पाणी ४,५०० क्युमेकपर्यंत जाईल असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. ते १०० किमी पर्यंत पोहोचू शकते.

# पवार, खाटोकर कारागृहात

## रूपाली चाकणकर यांनी घेतली पीडितेची भेट

### विद्यार्थिनी लैंगिक छळ प्रकरण

■ **महासागर प्रतिनिधी**
**बीड, दि. ६ :**

बीडमधील विद्यार्थिनी लैंगिक छळ प्रकरणानंतर आणखी एका मुलीच्या पालकांनी माझ्या मुलीशी क्लासचा संचालक विजय पवार याने त्याच्या शाळेत गैरवर्तन केल्याची तक्रार केली होती. आता या मुलीचा जबाब पोलिस नोंदवणार आहेत. शनिवारी विजय पवार व प्रशांत खाटोकर यांना पुन्हा न्यायालयासमोर हजर केले गेले. न्यायालयाने दोघांना न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर दोघांची जिल्हा कारागृहात रवानगी केली.

बीडमध्ये विजय पवार यांच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात नीटची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनीचा एक वर्ष लैंगिक छळ करण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर याचे राज्यभर पडसाद उमटत आहेत. आणखी काही मुलींशी असा प्रकार



झाला का याबाबत एसपींनी तक्रार देण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर एका मुलीच्या पालकांनी तक्रार दिली आहे.

शनिवारी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी बीडमध्ये भेट दिली. पीडितेशी चर्चा केली. शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांनी चाकणकर यांची भेट घेऊन या प्रकरणी सखोल चौकशीच्या सूचना देण्याबाबत निवेदन दिले. सामाजिक कार्यकर्त्यांनीही निवेदन दिले. मात्र चाकणकर यांच्याविरोधात पोस्ट केलेल्या राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या पदाधिकारी हेमा पिंपळे यांना मात्र शिवाजीनगर पोलिसांनी सकाळीच घरी स्थानबद्ध केले होते.

चाकणकर या एसपी कार्यालयात आल्यानंतर तिथेही महिलांनी मोठी गर्दी केली होती. धाराशिव जिल्ह्यात आत्महत्या केलेल्या साक्षी कांबळे हिच्या कुटुंबीयांनीही चाकणकर यांची भेट घेतली.

दोघांना शनिवारी दुपारी पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. या वेळी सरकारी पक्षाकडून पवार व खाटोकर यांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांची माहिती घ्यायची आहे, या व इतर मुद्द्यांवर पुन्हा वाढीव कोठडी देण्याची मागणी केली गेली. बचाव पक्षाकडून याला विरोध केला गेला.

# साडेपाच हजार बाल वारकऱ्यांमुळे पाथर्डीला पंढरीचे रूप

■ **महासागर प्रतिनिधी**
**पाथर्डी, दि. ६ :**

आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला शहरातील सर्व शाळांमधील सुमारे साडेपाच हजार विद्यार्थ्यांनी शहरात काढलेल्या दिंड्या, पालख्यांची सांप्रदायिक पद्धतीने काढलेली दिंडी, यामुळे शहराला पंढरीचे रूप येऊन वातावरण चैतन्याने भरून गेले. शाळांचा मार्ग मिरवणुकीसाठी बहुतेकांनी एकच निवडल्याने मध्यवर्ती चौक पंढरपूर भासत होता. बालवाडीपासून बारावीपर्यंतच्या एकूण बारा शाळांनी संपूर्ण संप्रदाय आज सजीव केला. रस्त्याच्या दुतर्फा



नागरिकांनी गर्दी करीत विविध पालख्यांवर फुलांची उधळण केली.

शहरातील स्वामी समर्थ विद्यालय, विवेकानंद विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय, एम.एम. निऱ्हाळी विद्यालय, आदर्श माध्यमिक विद्यालय, सावित्रीबाई कन्या विद्यालय, श्री तिलोक जैन इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीश्री रविशंकर विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, बीडीएस इंग्लिश मीडियम स्कूल, यशवंत पब्लिक स्कूल, जिल्हा परिषद शाळा, जिल्हा परिषद मुलींची शाळा यांसह अन्य शाळांनी विद्यार्थ्यांकडून अत्यंत परिश्रमपूर्वक तयारी करून घेत केलेले सादरीकरण कौतुकाचा विषय ठरले. टाळ पखवाज वाजवणारे विद्यार्थी, पावली, फुगड्या खेळत, धावत धावत ध्वज फडकावत पांडुरंगाचा धावा करणारे पथक पाहून सर्व जण चकित झाले. सुमारे पाचशे शिक्षक व प्रशिक्षकांनी १५ दिवस विद्यार्थ्यांना यासाठी प्रशिक्षण दिले. विशेष म्हणजे मुलांचे पाठांतर व एकाग्रचिताने सादर केले जाणारे पथक लक्षवेधी ठरले. विविध चौकात व रस्त्यावर लोकांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. स्वामी समर्थ विद्यालयाचे रस्त्यावरील प्रसाद वाटपाचा कचरा गोळा करणारे स्वतंत्र पथक होते.

विविध दिंड्यांनी पाणीबचत, पर्यावरण रक्षण, ग्रामस्वच्छता, पशुपक्ष्यांप्रती विशेष संदेश देणारे फलकही हातामध्ये घेतले होते. विविध संत व देवतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी कलाकारांमध्ये विशेषतः विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा, तर बहुतेक शाळांमधून उत्तम रितीने सादर झाली.

महासागर

सोमवार, दि. ७ जुलै २०२५

अमरावती

पान ३



अमरावी- आषाढी एकादशी निमित्त गाडगे नगर परिसरतील आषाढी उत्सव समितीच्या वतीने महाआरती करण्यात आली . तसेच त्या ठिकाणी विठ्ठल- रुक्मिणी मूर्तीची आकर्षित सजावट करण्यात आली. यावेळी वारकरी तरुणांनी आकर्षक अशी पावली सादर केली.( छायाचित्र-मनिष जगताप )

# शोषण करायचं अन् कंपनीराज आणायचं हे सरकारी षडयंत्र

## बच्चू कडू यांचा घणाघात | सातबारा कोरा करा पदयात्रा आजपासून

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – देशात आणि राज्यात सुरू असलेल्या राजकीय, धार्मिक व जातीय ध्रुवीकरणाच्या सावलीत शेतकरी व कष्टकऱ्यांच्या प्रश्नांची हत्या केली जात असल्याचा गंभीर आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केला आहे.

राज ठाकरे व उद्धव ठाकरे हिंदू म्हणून एकत्र येऊ शकतात, मराठा–ओबीसी एकत्र येऊ शकतात, तर शेतकरी–शेतमजूर का एकत्र येऊ शकत नाहीत? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. ते रविवारी स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.



7 जुलैपासून 138 किमी सातबारा कोरा करा पदयात्रा सुरू होत आहे. ही पदयात्रा भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ (अमरावती) येथून सुरु होऊन, साहेबराव करपे यांच्या आत्महत्याग्रस्त जन्मगाव चिलगव्हाण (यवतमाळ) येथे 14 जुलै रोजी समारोपास येणार आहे. कडू यांनी स्पष्ट केले की, या यात्रेला कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल. ही यात्रा कोणावरही दोषारोप करण्यासाठी नाही, तर शेतकऱ्यांना जागवण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी असणार आहे. मार्गात शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात येणार आहे.

कडू म्हणाले, शेती विकायची, शोषण करायचं आणि कंपनीराज आणायचं हे सरकारचं षडयंत्र आहे. मागील तीन महिन्यांत 767 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी जागा झाला तर सत्तेचं सिंहासन हादरेल, असा इशाराही त्यांनी दिला. विठोबा, सरकारला सद्बुद्धी दे, अशी प्रार्थनाही त्यांनी यावेळी केली.

### हिंदी सक्तीचं षडयंत्र का?

पदयात्रा ही केवळ आंदोलन नसून, शेतीविरोधी षडयंत्र उघडं पाडण्याची चळवळ आहे, असे ते म्हणाले. शेतकरी व मजूर एकत्र आले, तर सत्ताधाऱ्यांची झोप उडेल, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.सरकारच्या धोरणांवर टीका करताना ते म्हणाले की, साडे तीन लाख शेतकरी कुटुंबातील महिलांचे सिंदूर पुसले गेले. मजुरांना 6 महिन्यांपासून मजुरी मिळत नाही. विधवा, दिव्यांग, शेतमजुरांवर अन्याय सुरू आहे. मग्रारोहायो योजनेत पेरणीचा समावेश करून विधवा व दिव्यांग शेतकऱ्यांना जोडण्याची मागणी आम्ही करतो. राज्यात शेतीचं व्यापारीकरण आणि कारखानदारांची हुकूमशाही सुरू झाली आहे. चार लाख कोटींच्या खत व औषध बाजारात सरकार गुंतलेलं असताना, शेतकऱ्यांच्या शेणखताला सबसिडी नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. भाकड गायींसाठी काय धोरण आहे? हिंदी सक्तीचं षडयंत्र का? प्रभू श्रीरामाची शपथ घेऊन सत्तेवर आलेल्यांनी जबाबदारी घ्यावी, अशी थेट टीकाही त्यांनी भाजपवर केली.

# गोदाम फोडून सोयाबीन चोरी करणारी टोळी अटकेत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.6 )** – धामणगाव रेल्वे येथील शासकीय गोडाउन फोडून सोयाबीन आणि तूर चोरी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या टोळीकडून 90 हजार 890 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, गुन्ह्यात वापरलेली होंडा शाईन मोटारसायकल देखील हस्तगत करण्यात आली आहे. पोलिस सुत्रानुसार, 23 जून रोजी दत्तापुर पोलीस स्टेशन येथे गजानन रामदास राऊत (तालुका कृषी अधिकारी, धामणगाव रेल्वे) यांनी फिर्याद दिली होती. 20 ते 22 जूनच्या दरम्यान, शासकीय विश्रामगृह परिसरातील गोडाउनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोयाबीनच्या 27 गोण्या आणि तूर, असा एकूण 87 हजार 60 रुपयांचा मुद्देमाल चोरी केला. या माहितीवरून दत्तापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. याप्रकरणात पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या निर्देशानुसार आणि पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर आणि त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. गुप्त माहितीवरून मयूर प्रमोद कांबळे (वय 26, रा. धामणगाव रेल्वे) याला ताब्यात घेण्यात आले.

**90 हजार 890 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त**

# मामानेच केला विनयभंग

**अमरावती** – मानलेल्या मामाने केकमध्ये नशेचे औषध देऊन भाजीचाच विनयभंग केला आणि तिला फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्या वडिलांकडे 10 लाख रुपयांची मागणी केली. या धक्कादायक घटनेची तक्रार पिडित तरुणीने पोलिसात दिली. त्यानुसार पोलिसांनी 38 वर्षीय नागपूर स्थित आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. पिडित तरुणीच्या तक्रारीनुसार, आरोपी हा तिच्या आईच्या आत्याच्या मुलगा (म्हणजेच मामा समजला जाणारा) असून, डिसेंबर 2019 मध्ये एका कौटुंबिक कार्यक्रमात त्यांची ओळख झाली. त्यानंतर व्हॉट्सअॅपवर दोघांमध्ये संवाद सुरू झाला. डिसेंबर 2021 मध्ये आरोपी युवतीच्या घरी राहायला आला होता. त्यावेळी कॉलेजमधील एक मुलगा युवतीला त्रास देत असल्याचे तिने आरोपीला सांगितले. त्यावर मदतीचे आश्वासन देण्यात आले. डिसेंबर 2021 मध्ये घरातील लग्नासाठी युवती तिच्या आईसोबत नागपूरला गेली असता, त्यावेळी आरोपीने तिला केक खायला दिला. केक खाल्ल्यानंतर तिला अस्वस्थ वाटू लागले.

# गावठी दारूचा भट्टीखोर धंदा उघड!

## परिहारपुरा येथे महिलेला रंगेहाथ पकडले

**अमरावती** – वस्त्यांमध्ये चोरपावलांनी सुरू असलेली गावठी दारूची भट्टी पोलिसांनी उध्वस्त केली आहे. फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील परिहारपुरा परिसरात एका महिलेकडून चालू अवस्थेतील हातभट्टीसह गावठी दारूचा मोठा साठा अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने जप्त केला आहे. या कारवाईत 49 हजार 850 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधित महिलेविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पथक नियमित पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहितीच्या आधारे ही धाडसत्राची कारवाई करण्यात आली. आरोपी महिला भारती संतोष मोहोकार (वय 32, रा. परिहारपुरा, वडाळी) हिच्या घरात चालू चुलीवर मोहाचा सडवा तापवत गावठी हातभट्टी दारू तयार करत असल्याचे पोलिसांना आढळून आले. आरोपी महिला भारती संतोष मोहोकार (वय 32, रा. परिहारपुरा, वडाळी) ही तिच्या राहत्या जागी चालू अवस्थेतील हातभट्टीच्या चुलीवर गावठी दारू तयार करताना आढळून आली. पोलिसांनी त्वरित रेड टाकून तिच्या ताब्यातून पुढील प्रमाणे मुद्देमाल जप्त केला. यामध्ये 120 लिटर मोहाचा सडवा, 50 लिटर तयार गावठी हातभट्टी दारू व गावठी दारू तयार करण्याचे साहित्य असा एकूण 49 हजार 850 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणात आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम 65 (क), (फ), (ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे आणि पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण (गुन्हे शाखा) यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# पाटीपुरा येथे 75.790 ग्रॅम एमडीसह युवक अटक

## 8.88 लाखांचा साठा जप्त; नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– शहरातील अंमली पदार्थ विक्रीवर लगाम घालण्याच्या उद्देशाने नागपुरी गेट पोलिसांनी मोठी कारवाई करत 75.790 ग्रॅम 'मेफेड्रॉन' (एमडी) ड्रग्जसह एकाला अटक केली आहे. जप्त करण्यात आलेल्या या एमडीची अंदाजे बाजारभावानुसार किंमत 8 लाख 88 हजार 450 रुपये आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव इमरान खान ऊर्फ मुम्मू सलीम खान (वय 26, रा. पाटीपुरा, अमरावती) असे आहे.



पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांना गुप्त माहिती मिळाली की, इमरान खान एमडी ड्रग्जची विक्री करतो. त्यानंतर पोलिसांनी पाटीपुरा परिसरात 12 दिवसांपासून त्यावर गुप्तपणे नजर ठेवून माहितीची खातरजमा केली. रविवारी पोलिसांनी इमरान खानच्या घराजवळ छापा टाकला. त्याच्या मोपेडची झडती घेतली असता 75.790 ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आले. फॉरेन्सिक तज्ज्ञ व शासकीय पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. पोलिसांनी एमडीसह मोपेड वाहन देखील जप्त केले. या कारवाईत पीएसआय विधाते, भार्गव, तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### मुंबईपर्यंत एमडी नेटवर्कचा संशय

इमरान खानने हे अंमली पदार्थ कुठून आणले? कोणाला विकले? याचा शोध सुरू आहे. प्राथमिक चौकशीत ही एमडी मुंबईहून आल्याचे उघड झाले आहे. पुढील काळात शहरातील अंमली विक्रेत्यांच्या टोळ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा निरीक्षक उरलागोंडावार यांनी दिला.


### पूर्वीही झाली होती मोठी कारवाई

याच नागपुरी गेट पोलिसांनी 2 महिन्यांपूर्वी 62 ग्रॅम एमडी जप्त केले होते. तेव्हा आरोपीकडून मिळालेल्या माहितीवरून मुंबईत तपास पथक पाठवले गेले होते. मात्र अपेक्षित साठा सापडला नव्हता.

# मोर्शी-नशीदपूर फाट्याजवळ दुचाकींची भीषण धडक

## युवक ठार, गर्भवती महिला व दोन तरुणी गंभीर जखमी







**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.6 )**– मोर्शी–सिंभोरा रस्त्यावर असलेल्या नशीदपूर फाट्याजवळ दुचाकी व स्कूटीमध्ये समोरासमोर झालेल्या भीषण धडकेत नकुल राजेश नवले (वय 23, रा. अंतोरा) या युवकाचा जागीच मृत्यू झाला असून, एका गर्भवती महिलेसह दोन तरुणी गंभीर जखमी झाल्या आहेत. सदर घटना आज 6 जुलै 2025 रोजी सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास घडली.

प्राप्त माहितीनुसार, करिष्मा भीमराव रामटेके (वय 32, रा. वरुड), महिमा प्रदीप भोकरे (वय 25, रा. अमरावती), दीपाली हरिदास पाटील (वय 23, रा. ब्राह्मणवाडा भगत) या तिघी महिला इसाफ बँक मोर्शी येथे कार्यरत आहेत. रविवारची सुट्टी असल्यामुळे त्या अप्पर वर्धा धरण पाहण्यासाठी स्कूटी (क्र. एमएच 27 डीयू 6509) ने गेल्या होत्या. परत येत असताना अंतोरा येथे जात असलेला नकुल नवले आपल्या मोटरसायकलने (क्र. एमएच 27 एपी 2765) या रस्त्याने येत होता. त्याच दरम्यान दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात नकुलचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे, तसेच रवी परतेती, श्याम मोरे, यश पांडे, अभिषेक झोड, तेजस नागले यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी इरफानभाई यांच्या अॅम्बुलन्सद्वारे जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर जखमींची स्थिती गंभीर असल्याने त्यांना तातडीने एक्झॉन हॉस्पिटल, अमरावती येथे हलविण्यात आले.




# ग्रामपंचायत कार्यालय वणी ( ममदापुर )

## पंचायत समिती, तिवसा

## निविदा सुचना

ग्राम पंचायत कार्यालय वणी (ममदापुर), पंचायत समिती तिवसा जि. अमरावती यांचे मार्फत जि.प. क्षेत्रातील प्राथमिक/माध्यमिक शाळाच्या इमारती, वर्गखोली स्वच्छता गृह दूरुस्ती लेखाशिर्ष 2202-जे-635 अंतर्गत कामे व आरोग्य उपकेंद्र अग्नीसुरक्षा यंत्रणा खरेदी, दुरस्ती विस्तारीकरण व देखभाल 2210 आय 192 सन 2024-2025 या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ वर्षाकरीता मोहरबंद कामाचे निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये जिल्हा परिषद अमरावती यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्राम पंचायत वणी (ममदापुर), पंचायत समिती तिवसा जि. अमरावती यांच्याकडून देण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | कामाचे स्थळ | अंदाजित कामाची किंमत | प्रशासकीय मान्यतेचा ठराव क्रं व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रं व दिनांक | कोऱ्या निविदा स्विकारण्याचा दिनांक (कार्यालयीन वेळ) | भरलेल्या निविदा स्विकारण्याची दिनांक (कार्यालयीन वेळ) | निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२१० आय १९२ सन २०२४-२०२५ | उपकेंद्र ममदापुर येथे वॉल कंपाऊड बांधकाम करणे | ममदापुर | ८,३९,५८५/- | २०७५/२५-१४ २७/०३/२०२५ | ८-०४ ३५६/२५ | ०७-०७-२०२५ | १२-०७-२०२५ | १४-०७-२०२५ | |
| २ | २२०२-जे-६३५ | वणी ममदापुर येथे शाळा दुरुस्ती करणे | वणी | २,९३,०५५/- | २८३३-३४८ २८-०३-२०२५ | ६३५-२५-२६ | ०७-०७-२०२५ | १२-०७-२०२५ | १४-०७-२०२५ | |

टिप :-

१. निविदेच्या अटी व शर्ती ग्राम पंचायत वणी (ममदापुर), पंचायत समिती तिवसा येथे कार्यालयीन वेळेत पाहायला मिळेल.

२. निविदा या द्वि लिफाफा पद्धतीने सादर करावयाचे आहे.

३. निविदा स्विकारण्याची तसेच काही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार सरपंच/सचिव ग्राम पंचायत कार्यालय वणी (ममदापुर) जि. अमरावती

सरपंच/सचिव
ग्राम पंचायत कार्यालय
वणी ( ममदापुर ) जि. अमरावती


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती


मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

भारत सरकारच्या मुंबई दूरदर्शन केंद्रात निर्माता, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात संचालक म्हणून आणि सेवानिवृत्तीनंतर आता न्यूज स्टोरी टुडे पोर्टलचे संपादक म्हणून अशी ४० वर्ष प्रसार माध्यमात सक्रिय असलेले, मुळचे विदर्भातील अकोला येथील असलेले देवेंद्र भुजबळ यांचा जन्म ४ जुलै १९६० रोजी संगमनेर येथे आजोळी झाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा लेखप्रपंच.

-------------




ज्येष्ठ संपादक राजदीप सरदेसाई यांच्याहस्ते मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात आलेले सन्माननीय सह सदस्यत्व स्वीकारताना देवेंद्र भुजबळ



तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते "आम्ही अधिकारी झालो" या पुस्तकाचे प्रकाशन



तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उत्कृष्ट पोर्टलचे संपादक म्हणून चौथा स्तंभ हा राज्यस्तरीय पुरस्कार स्वीकारताना देवेंद्र भुजबळ.

# सेवाभावी देवेंद्र भुजबळ

**मारुती विश्वासराव**
**नवी मुंबई.**

देवेंद्र भुजबळ यांनी आर्थिकदृष्ट्या आकर्षक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या सोडून विचारपूर्वक माध्यम क्षेत्र निवडले. नगर येथील दैनिक समाचारमध्ये उपसंपादक कम वार्ताहर, पुणे येथील दैनिक केसरी मध्ये उपसंपादक, साप्ताहिक सह्याद्रीमध्ये विशेष प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले.

दूरदर्शनच्या सहा वर्षांच्या सेवा काळात भुजबळ यांनी अनेक कार्यक्रम, माहितीपट, दूरदर्शन वृत्तांत निर्माण केले.अनेक कार्यक्रमांच्या निर्मितीत योगदान दिले. संहिता लेखन केले.काही कार्यक्रमात सहभाग घेतला.

पुढे दूरदर्शन सोडून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत आल्यावर त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या दूरदर्शनवरील "शिवशाही आपल्या दारी" या २४ भागांच्या मालिकेच्या, सोमवार ते शुक्रवार अशा दीड वर्षे प्रसारित झालेल्या "माय मराठी" कार्यक्रमाच्या, तसेच मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रसंगी योग्य वातावरण निर्मिती करण्यासाठी दूरदर्शनवर चालविल्या गेलेल्या मोहिमेच्या निर्मिती आणि प्रसारणात समन्वयक अधिकारी म्हणून महत्वाची भूमिका बजावली.

दूरदर्शनच्या गाजलेल्या "महाचर्चा" कार्यक्रमाचे ते ४ वर्षे रिसर्च अँड रिसोर्स पर्सन होते. आकाशवाणी वरील महाराष्ट्र शासनाच्या "दिलखुलास" कार्यक्रमाच्या पहिल्या ५०० भागांचे ते टीमलीडर होते. आकाशवाणीच्या काही कार्यक्रमांमध्ये देखील त्यांनी सहभाग घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महान्यूज वेबपोर्टलसाठी करिअरनामा हे सदर भुजबळ यांनी सुरू केले. या सदरासाठी ते स्वतः नियमित लेखन करीत असत. त्यांचे हे लेख विविध वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध होत.

ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे झालेल्या चौथ्या विश्व सावरकर साहित्य संमेलनात भुजबळ यांचे "स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता" या विषयावर झालेले व्याख्यान विशेष गाजले. मलेशियातील चौथ्या विश्व शब्द साहित्य संमेलनाचे ते उद्घाटक होते. या बरोबरच त्यांची विविध ठिकाणी संवाद सत्रे झाली आहेत.दोन वर्षांपूर्वी अमेरिकेत असताना,त्यांचे शिकागो मराठी मंडळाने "स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता " या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

देवेंद्र भुजबळ हे विविध विषयांवर सातत्याने लिहीत असतात. तसेच विविध विषयांवर व्याख्याने देखील देत असतात. "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता " हा त्यांचा संशोधनपर लेख मराठी बरोबरच हिंदी, इंग्रजी, गुजराती, ऊर्दू भाषेतही प्रसिद्ध झाला आहे .

साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक नाट्य, चित्रपट, दूरदर्शन, प्रसार माध्यमे यात देवेंद्र भुजबळ सतत कार्यरत असतात. समाजातील दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांसाठीही ते काम करत असतात. गणित आणि विज्ञान विषयांची नावड त्यात बिकट कौटुंबिक परिस्थितीमुळे दहावीत नापास झाल्यामुळे त्यांना दोन वर्षे शिक्षणापासून दूर रहावे लागले.

पुढे पडेल ते काम करत ते शिकले. देवेंद्र भुजबळ हे पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रा. एल. एन. गोखले पाठ्यवृत्तीचे सर्व प्रथम मानकरी ठरले. तर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाच्या मास्टर्स पदवीत ते प्रथम श्रेणीत सर्व प्रथम आले. भारत सरकारच्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, इंडीयन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, महाराष्ट्र शासनाच्या यशदा या संस्थांचे माध्यम अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी त्यांना त्या त्या सरकारांच्या नोकरीत असताना मिळाली.

भुजबळ यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार, मान सन्मान मिळाले आहेत. नुकताच त्यांना मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे इंडिया टुडे वृत्तवाहिनीचे सल्लागार संपादक राजदीप सरदेसाई यांच्या हस्ते त्यांना सभासदत्व बहाल करण्याचा सन्मान झाला.

भुजबळ यांची आता पर्यंत भावलेली व्यक्तिमत्वे, गगनभरारी, प्रेरणेचे प्रवासी, स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता, करिअरच्या नव्या दिशा, अभिमानाची लेणी, समाजभूषण,आम्ही अधिकारी झालो ,ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

शासकीय सेवेत असताना, शासनाच्या विविध प्रकाशनांचे त्यांनी संपादन केले आहे. तर निवृत्ती नंतर न्यूज स्टोरी टुडे पब्लिकेशन्स साठी "जीवनप्रवास" "समाजभूषण २" "मी,पोलीस अधिकारी" "पौर्णिमानंद" :(काव्य संग्रह) "अजिंक्यवीर " "अंधारयात्रीचे स्वप्न" "चंद्रकला" कादंबरी, "हुंदके सामाजिक वेदनेचे" "मी शिल्पा, सत्तरीतील सेल्फी या पुस्तकांचे संपादन केले आहे.

त्यांची "नर्मदा परिक्रमा "मी वाचलेली पुस्तके" "अमेरिका अमेरिका" "माहिती"तील आठवणी", "बाबासाहेब आणि आम्ही" ही आगामी प्रकाशने आहेत.

देवेंद्र भुजबळ यांना त्यांच्या या प्रसार माध्यमाच्या कार्यात त्यांच्या पत्नी सौ. अलका भुजबळ या चांगल्या सहकार्य करतात. त्यांचे "कॉमा " हे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असून या पुस्तकामध्ये त्यांनी कॅन्सरवर यशस्वीरित्या मात केल्याचे प्रेरणादायी अनुभव कथन केले आहे.

नवी मुंबई सानपाडा येथील मिलेनियम टॉवर मध्ये राहणारे देवेंद्र भुजबळ व सौ अलका भुजबळ ही जोडी न्यूज स्टोरी टुडे पोर्टल या प्रसार माध्यमातून अनेकांचे सामाजिक कार्य प्रसिद्धी झोतात आणीत आहेत. देवेंद्र भुजबळ व सौ. अलका भुजबळ या दाम्पत्याच्या सामाजिक कार्याला सलाम.

# पालकांनो, आपल्या मुली नका देऊ श्रीमंत घरी..

**पूर्वार्ध**

आजकाल बहुतांश पालकांना मुलीसाठी मुलगा कसा हवा आहे? हा प्रश्न जर विचारला तर प्रत्येक पालकाचे उत्तर हेच असेल की, मुलगा चांगल्या नोकरीला असावा, त्याच्याकडे भरपूर पैसा व संपत्ती असावी, राहण्यासाठी आलिशान बंगला असावा, त्याला भरपूर शेती आणि फिरायला चारचाकी गाडी असावी, पुणे व मुंबई सारख्या नामांकित ठिकाणी त्याचे प्लॉट असावे. तो सर्व आर्थिक बाजूंनी भक्कम असावा अशा श्रीमंत मुलालाच मी माझी मुलगी देणार, हे प्रत्येक पालकांचे ध्येय बनले आहे.

त्यासाठी जवळच्या पाहुण्यांना व नातेवाईकांना आपल्या मुलीसाठी चांगले स्थळ बघा म्हणून ते सांगतात. जोपर्यंत मुलीला चांगले स्थळ भेटत नाही, तोपर्यंत त्यांना सुखाची झोप सुद्धा लागत नाही.?अहोरात्र त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास लागलेला असतो, तो म्हणजे माज्या मुलीला श्रीमंत स्थळ मिळावे, माज्या मुलीला नोकरदार मुलगा मिळावा, जेणेकरून माझी मुलगी आनंदात व सुखात नांदेल. म्हणून बहुतांश पालक तसा श्रीमंत मुलगा शोधण्यासाठी जीवाचे रान करतात.

त्यांना तो मुलगा वागायला, बोलायला व दिसायला कसाही असला तरी चालतो, फक्त तो श्रीमंत असावा, मुलीला घराच्या बाहेर काढणारा नसावा, मुलीला जीवापाड जपणारा असावा, म्हणून ते चारचौघात गेल्यावर, कोणाच्या कार्यक्रमात गेल्यावर, मित्रांमध्ये बसल्यावर किंवा कुठेही चर्चेत गेल्यावर ते आपल्या मुलीसाठी चांगले स्थळ विचारतात.

बसने प्रवास करत असताना समोरील बाकावर दोन प्रवासी बसले होते. त्यात एक प्रवासी वयोवृद्ध होता तर एक प्रवासी तरुण होता, त्यांच्या आपसी बोलण्यावरून ते दोघे नातेवाईक असल्याचे समजले. त्या तरुणाला एकुलती एक मुलगी असून तो मुलीसाठी चांगले स्थळ पाहण्याच्या शोधात हिंडत होता. तेव्हा त्या तरुणाने त्या आजोबांना माझ्या मुलीसाठी कुठे चांगले स्थळ असेल तर कळवा म्हणून सांगितले.

तेव्हा ते आजोबा म्हणाले की, बाळा तुझ्या मुलीसाठी मी चांगले स्थळ बघतो, पण तुला मुलगा कसा हवा आहे? त्या मुलाकडून तुझ्या अपेक्षा काय आहेत? मुलगा गरीब घरातील असावा की, श्रीमंत घरातील? तेव्हा तो तरुण त्या वयोवृद्ध आजोबांना म्हणाला की, माझ्या मुलीला श्रीमंत व नोकरदार मुलगा हवा आहे, त्याच्याकडे भरपूर पैसा व संपत्ती असावी, नोकरचाकर असावेत, आलिशान गाडी व आलिशान बंगला असावा, भरपूर शेती व संपत्ती असावी, तो दिसायला सुंदर असावा आणि त्याचे मोठ्या शहरात प्लॉट असावे. मुलीसाठी मी कितीही हुंडा द्यायला तयार आहे, असे सांगतो.

पण तेवढ्यात गाव येते आणि बस थांबल्यावर ते आजोबा गाडीतून खाली उतरतात. आणि आपल्या घराच्या दिशेने निघतात. मुलाने त्या आजोबांना केवळ श्रीमंत मुलगा शोधा म्हणून सांगितले पण त्याची वर्तणूक, त्याचे राहणीमान, त्याचे चारित्र्य, संस्कार, त्याचे व्यक्तिमत्व आणि व्यसन यावर तो काहीच बोलला नाही. याचा अर्थ असा की, मुलगा कसाही असला तरी चालतोय, पण तो खूप श्रीमंत, नोकरदार, जमीनदार, पैसेवाला आणि गाडी व बंगला असणारा असला पाहिजे, अशी भावना आजकाल सर्वच लोकांची होऊन बसली आहे.

पालकांनो आजकाल मुलींचे लग्न मुलाच्या बंगल्याकडे व श्रीमंतीकडे बघून न जमवता आपली मुलगी त्या घरात सुखाने व आनंदाने राहील का? हा विचार करून प्रत्येकाने आपल्या मुलीचे लग्न लावले पाहिजे. मग तो मुलगा श्रीमंत घरातील असो किंवा गरीब घरातील असो, तो आपल्या किती सुखी ठेवतो? याचा विचार करून आजकालच्या मुलींनी लग्नास तयारी दर्शवली पाहिजे. नसेल तर आयुष्यभर अविवाहित राहिलेले बरे. असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. त्यासाठी मुलगा व्यसनी नसावा, दारू व गांजा पिणारा नसावा, गरीब व होतकरू असावा, मुलीला जीवापाड जपणारा असावा, मटका व पत्ते खेळणारा नसावा, त्याला कोणतेच वाईट व्यसन नसावे, तो उच्चशिक्षित व चारित्र्यसंपन्न असावा तरच त्या घरात मुलीला सुखाची व समाधानाची झोप लागेल आणि चांगले व सुखद आयुष्य जगण्याचे भाग्य मिळेल.

मुलीच्या संसाराचा गाडा सुरळीत चालेल, म्हणून पालकांनो मुलीला श्रीमंत घरी देण्यापेक्षा गरीब परंतु, सुखी घरी देण्याचा विचार करावा. श्रीमंत घरातील अनेक मुलींना पतीच्या व सासू-सासऱ्याच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करावी लागली आहे. म्हणून अगोदरच विचार करून लग्न केलेले बरे.

(लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकी)

-------------------

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर, जि. लातूर.**
**7498715661**

■ ■ ■

# गुरूंचे जीवनातील महत्व

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**



भारतीय संस्कृती ही पृथ्वीतलावरील सर्वात प्राचीन आणि महान संस्कृती मानली जाते. आज जगभरात भारताला जो मान सन्मान आहे तो येथील संस्कृती आणि परंपरांमुळे. काळाच्या ओघात जगातील अनेक संस्कृती लोप पावल्या.

भारतावरही अनेक सांस्कृतिक आक्रमणे झाली आणि होत आहेत मात्र पुरातन भारतीय संस्कृती त्याही स्थितीत टिकून आहे. दिवसागणिक तिचे महत्व वाढत आहे. येथील कुटुंबव्यवस्था, येथील नैतिक मूल्ये, धार्मिक रूढी परंपरा, सांस्कृतिक ठेवा, ग्रंथ संपदा, सण-उत्सव, पुरातन मंदिरे आणि वास्तू, येथील ऋषी-मुनींचे संशोधन, त्यांनी हजारो वर्षांपूर्वी घालून दिलेली शिकवण यांचे आकर्षण आज पाश्चात्यांनाही आहे. त्यामुळे येथील संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आणि ती अनुभवण्यासाठी दरवर्षी लाखो संशोधक आणि पर्यटक हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येत असतात.

असे म्हणतात भारताचे एका वाक्यात वैशिष्ट्य सांगायचे म्हटल्यास येथील 'गुरु-शिष्य परंपरा' असेच सांगता येईल. आजतागायत या भूमीत गुरु-शिष्याची अनेक उदाहरणे होऊन गेली ज्यांची नावे इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली. गुरूंनी आपल्या शिष्याला सर्वोत्तम घडवण्यासाठी घेतलेली मेहेनत आणि गुरूंना भगवंताच्या स्थानी मानून शिष्याने केलेली गुरूंची सेवा आणि त्यांचे आज्ञापालन यांच्या कथा आजच्या पिढीला प्रेरणा आणि संजीवनी देतात. गुरूंचे दोन प्रकार आहेत.

जे व्यावहारिक ज्ञान देऊन भौतिक प्रगती घडवून आणतात ते व्यावहारिक गुरु. आपल्या आयुष्यात असे अनेक गुरु मिळतात जे आपल्याला मार्गदर्शन करून व्यवहारातील अनेक प्रतिकूल प्रसंगातून सोडवतात तर दुसरे म्हणजे आध्यात्मिक गुरु जे तुमची आध्यात्मिक प्रगती घडवून आणून तुम्हाला जन्म मृत्यूच्या चक्रातून सोडवतात म्हणजेच आत्म्याचे परमात्म्याशी मिलन घडवून आणतात. हे तुम्हाला साधना सांगून ती तुमच्याकडून ती करवून घेतात.

हे तुमच्या प्रापंचिक अडचणी सोडवत नाहीत कारण या अडचणी तुमच्या गत जन्मीच्या कर्मांमुळे आलेल्या असतात आणि त्या या जन्मात भोगल्या नाहीत तर त्यासाठी दुसरा जन्म घ्यावा लागेल हे तुमच्या मनावर बिंबवतात. या अडचणींकडे साक्षीभावाने कसे पाहायचे हे ते शिकवतात.

८४ लक्ष योनीचा फेरा पार पडल्यानंतर मनुष्य जन्म मिळतो. त्यामुळे या जन्मात साधना करून मनुष्याने भगवंताची प्राप्ती करणे म्हणजेच जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्त होणे अपेक्षित असते; मात्र मनुष्यावर असलेल्या गतजन्मीच्या संस्काराच्या प्रभावामुळे तो मायेच्या अधीन राहून सुखात रममाण होतो, परिणामी त्याला त्याच्या ध्येयाचा विसर पडतो. हे ध्येय लक्षात आणून देण्याचे कार्य गुरु करत असतात.

गुरु साधकांकडून साधना करवून घेतात आणि त्याला शिष्याच्या अवस्थेत आणतात. एकदा शिष्यावस्था प्राप्त झाली की गुरु त्याला पुढच्या टप्प्याची साधना सांगतात, त्याला मोक्षाची वाट दाखवतात. गुरूंच्या आज्ञेचे तंतोतंत पालन करणारा शिष्य मानवी जन्माचे सार्थक करतो.

व्यावहारिक जीवनात अडचणींना सामोरे जाण्याचे बळ गुरु देतात त्यामुळे गुरूंचे जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरु-शिष्याचे अनोखे नाते असते. गुरूंच्या आज्ञेपुढे शिष्याला कशाचीही किंमत कळत नाही आणि आपल्या शिष्याची आध्यात्मिक प्रगती होत नाही तोपर्यंत गुरूंनाही चैन पडत नाही. गुरु शिष्याची भगवंताशी म्हणजेच सुख दुःखाच्या पलीकडील आनंदाशी भेट घडवून आणतात म्हणून शिष्याला गुरु हे सदैव देवाच्या स्थानी असतात.

■ ■ ■

# धानावरील किडींचे व्यवस्थापन

धानावरील खोड किडीच्या व्यवस्थापनाकरीता रोवणी झाल्यापासून ३० दिवसांनी ट्रायकोग्रामा पोनिकम या परोपजीचे किटकाची अंडी हेक्टरी १,६०,०००.८ कार्ड या प्रमाणात एकूण सहा वेळेला दर आठवड्याच्या अंतराने प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे

१. खोडकिडा : खोडकिडा प्रतिकारक धानाच्या जातींची उदा साकोली ८, सिंदेवाही ५ या वाणांची लागवड करा.

२. रोवणी रोपांची मुळे क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही १० मिण्ली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात तयार केले के मिश्रणात १२ तास बुडवून ठेवावीत व नंतर रोवणी करावी.

३. ट्रायकोग्रामा जॅपोनिकम हे परोपजीवी कीटक हेक्टरी ५०००० या प्रमाणात दर ७ दिवसाचे अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे सोडण्यापूर्वी व सोडल्यानंतर ३ ते ४ दिवस किटकनाशकाची फवारणी करू नये.

४. शेतात ५ टक्के किडग्रस्त फुटवे दिसताच अझाडिरेक्टीन ०.१५ टक्के ३० ते ५० मिण्ली किंवा कार्बोसल्फान २५ टक्के १६ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमा मिसळून फवारावे किंवा कार्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार २५ किंवा फिप्रोनिल ०३ टक्के दाणेदार १६.६७ कि हे या प्रमाणे बांधीमध्ये टाकावे.

५. धानाची कापणी जमिनीलगत करावी.

६. घान कापणीनंतर वापसा असताना नांगरट करून धसकटे गोळा करून नष्ट करावे.

**रोपवाटीकेत व्यवस्थापन** : धान पिकाच्या अधिक उत्पादनाकरीता व खोडकिडीच्या व्यवस्थापनाकरीता कार्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार २५ किले ग्रॅम प्रति हेक्टरी ; कार्बोफ्यूरॉन ३ टक्के दाणेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका रोप काढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे आणि खोडकिडा व पाने गुंडाळणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी लावणीनंतर ६० ते दिवसांनी खोडकिडा; पाने गुंडाळणाऱ्या अळीने जीवंत अळीसह २ प्रादुर्भावग्रस्त पाने शीत चुड आर्थिक नुकसान पातळी गाठल्यास त्यांच्या व्यवस्थापनासाठी कारटॅप हायड्रोक्लोराईड ५० टक्के एसपी १२ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**पुष्पक बोथीकर**
विषयतज्ज्ञ, पीक संरक्षक कृषी विज्ञान केंद्र, गडचिरोली.
**मोहितकुमार गणवीर**
कृषि हवामान निरीक्षक, कृषी विज्ञान केंद्र, गडचिरोली.

**२. गादमाशी :**

प्रतिकारक जातींची उदा सिंदेवाही २००१ साकोली८ व पीण्केव्ही गणेशची लागवड करा.

गादमाशी प्रवण क्षेत्रामध्ये पानावरील गादमाशीचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता शिफारसीत तारखेच्या १५ दिवस लवकर रोवणी २ ते २० जुलै दरम्यान करण्यात यावी.

गराडीची पाने १५० टन प्रति हेक्टर याप्रमाणात चिखलगांचे वेळी शेतात टाकावीत यामुळे तुडतुडे आणि खोडकिडीचा प्रादुर्भाव सुध्दा कमी होतो.

सभोवतील पूरक वनस्पतीचा ;देवधान नाश करावा.

किडग्रस्त रोपे काढून नष्ट करावीत.

गादमाशी प्रवण क्षेत्रात रोवणीनंतर १० आणि ३० दिवसांनी तर इतर क्षेत्रात ५ टक्के चंदेरी पोंगे इतका प्रादुर्भाव आढळताच दाणेदार कार्बोफ्युरॉन ३ टक्के २५ किलो अथवा दाणेदार क्विनॉलफॉस ५ टक्के ५ किलो प्रति हेक्टरी बाधीमध्ये ७ ते १० सेंमी २ ते ३ इंच पाणी असताना टाकावे बांधीतील पाणी चार दिवसपर्यंत बांधीबाहेर काढू नये.

■ ■ ■

## गुरुतत्त्व एकच

**वाचक लिहितात**

ईश्वर आणि गुरु एकच आहेत. गुरु म्हणजे ईश्वराचे सगुण रूप आणि ईश्वर म्हणजे गुरूंचे निर्गुण रूप. समाजातील बरेच लोक गुरुपौर्णिमा साजरी करतात. सर्वच आपापल्या गुरूंविषयी कृतज्ञता भावाने, त्यांना शरण जाऊन त्यांची पूजा अर्चना करतात.

परंतु हे करीत असताना गुरुतत्वाचे मुळ रूप लक्षात न घेता सगळ्या कृती घडत असतात. काही लोक स्वामी समर्थ महाराजांना, तर काही साईबाबांना, कोणी गोंदवलेकर महाराजांना, तर कोणी प्रल्हाद महाराजाना गुरु मानतात, तर काही भक्तराज महाराजांची भक्ती करतात. म्हणजे प्रत्येकच जण आमचे हे गुरु आहेत असे सांगत असतात. परंतु या सगळ्यां संतांनी गुरुतत्व एकच आहे हीच शिकवण दिली.

एकदा एक भक्त गजानन महाराजांना विचारतो, "माझा खरा गुरु कोण?" त्यावर महाराज म्हणाले,"गुरु शोधायचा नाही, तो जाणायचा असतो. तो तुज्या अंतःकरणात आहे. ज्याच्या शब्दांत ब्रह्मज्ञान आहे, तोच खरा गुरु!"

एका भक्ताने अक्कलकोट स्वामी समर्थांना विचारले, "स्वामी, मी अनेक गुरु शोधले, कुणावर श्रद्धा ठेवावी हेच कळेना." त्यावर स्वामी समर्थ म्हणालेः "ज्याच्याजवळ श्रद्धा ठेवलीस, त्याच्यात मीच होतो.

गोंदवलेकर महाराज म्हणत.. "माझा गुरु कोण? तो 'राम' आहे! जो राम नामात लीन आहे, त्याला वेगळ्या गुरुची गरज नाही. राम नामच गुरुतत्त्व आहे.ह्व

संत भक्तराज महाराज यांनी त्यांच्या शिष्यांना सांगितले "माज्या पश्चात माझं तत्त्व डॉ. जयंत आठवलेंच्या माध्यमातून कार्य करत राहील.

साई बाबांनी त्यांच्या भक्तांना सांगितलं..."गोदड महाराजांमध्ये माझंच तत्त्व आहे. त्यांचं दर्शन म्हणजे माझंच दर्शन आहे.

श्रीरामकृष्ण परमहंस यांनी स्वामी विवेकानंद (नरेंद्र) यांच्याकडे पाहून स्पष्टपणे म्हटलं... "हे माझं काम पुढे नेणारं व्यक्तीमत्त्व आहे. माझं तत्त्व याच्यामध्ये कार्य करेल.

यातून स्पष्ट होत की, देह बदलतात, पण त्यांचं तत्त्व म्हणजे ईश्वरी कार्य करणारी ऊर्जा तीच असते.

गुरु तत्त्व देहाच्या पलीकडचं आहे आणि ते कालातीत व सर्वव्यापक तत्व आहे. जसे पाण्याच्या टाकीला लहान मोठ्या बऱ्याच तोट्या असल्या, तरी प्रत्येक तोटीतून टाकीतीलच पाणी येते. त्याचप्रमाणे कोणत्याही देहधारी किंवा परब्रम्ह गुरूंची उपासना केली, तरी त्यांच्यातील गुरुतत्त्व म्हणजे ईश्वरी तत्व एकच असते. हे लक्षात घेऊन सगळ्यांकडे सम भावाने बघून साधनास केल्यास आध्यात्मिक प्रगती लवकर होते..

■ **डॉ. स्वाती देशमुख, नागपूर.**



# रात्री लाईट आहार घ्यायचाय?
## या लाईट फूडचा करा डाएटमध्ये समावेश

रात्रीच्या वेळी जड अन्नपदार्थांमुळे अपचन आणि इतर त्रास होत असतो म्हणून रात्रीचा हलका आहार खाने गरजेचे असते. जड अन्नपदार्थ पचन होण्यास जड असतात. त्याने गॅस, एसिडीटी आणि ब्लोटींगची समस्या होऊ शकते. अनेक जण रात्रीचे जेवण करणे टाळतात. परंतू जर भूक लागली तर झोप देखील येत नाही. त्यामुळे रात्रीचा आहार असा असावा ज्याने पोटही भरल्या सारखे वाटेल आणि वजनही वाढणार नाही. तसेच जळजळ आणि एसिटीडी इतर समस्या होणार नाही.

**मुगाच्या डाळीचं सूप** : मुग डाळीचे सुप पचायला हलके असते. हे सुप प्रोटीनने पुरेपूर असते. रात्री उशीरा फूड क्रेविंग्स रोखण्यास हे मदत करते. आणि पोटही भरलेले वाटते.

**रोस्टेड मखाना** : हा क्रंची नट्स एकदम लो कॅलरी असतो आणि ते खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे तुम्हाला सटरफटर खाण्याची क्रेविंग्स देखील होत नाही.. आणि तुम्ही आरामात झोपू शकतात.

**गरम दूधात हळद टाकून पिणे** : खूप भूक लागली नसली तरी काहीतरी खाण्याची इच्छा रात्रीची होते. तेव्हा गरम दूध आणि हळद टाकून प्यायल्यास बॉडी रिलॅक्स होते. आणि पचन यंत्रणा बूस्ट होते. आणि रात्री चांगली झोप देखील येते.

**मसाला पनीर** : रात्री मसाला पनीर खाल्ल्याने पोट बराच काळ भरलेले रहाते. यातही प्रोटीनचे प्रमाण चांगले असते. यामुळे तुम्हाला ब्लोटींग देखील होत नाही.

**काकडी-पिनट चाट** : जर रात्री काही हलके पदार्थ खाऊन पोट भरायचे असेल तर काकडी - पीनट चाट देखील खाऊ शकता.यात हैल्दी फॅट आणि फायबरचे प्रमाण मोठे असते. तसेच काकडी खाल्ल्याने आपण डायड्रेट देखील रहातो.

**व्हेजिटेबल पोहे** : कमी तेलात आणि भरपूर भाज्या टाकून केलेले पोहे देखील डिनरसाठी चांगला पर्याय आहे. हे पोहे खाल्ल्याने जडपणा वाटत नाही आणि पोटही भरलेले रहाते. आणि ते सहज पचन होतात तसेच एनर्जी देखील मिळते.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## हरी बोल

एकादशीच्या उपवासाने होतो
सात्विक प्रवृत्तीचा विकास
'गॉड टू कनेक्शन' चा
हा उपाय आहे हमखास..

ध्यानधारणा व चिंतनाची
उपवासाला हवी साथ
तरच योग्य परिवर्तन
दिसून येईल जीवनात...

काया वाचा मनसा जर
लागला श्रीहरिचा ध्यास
सत्कर्मच होतील हाताने
नौका लावेल तो पैल तीरास..

# राजकोट येथे सर्वात मोठा, प्रगत एच अँड एच ल्युमिनियम सोलर फ्रेम उत्पादन प्रकल्प कार्यान्वित

**अहमदाबाद, गुजरात, दि. ०६ जुलै :** गुजरातमधील एच अँड एच ल्युमिनियम प्रा.लि.ने गुजरातमधील राजकोट येथे भारतातील सर्वात मोठा आणि सर्वात प्रगत ल्युमिनियम सोलर फ्रेम उत्पादन प्रकल्प सुरू केला आहे. राजकोटच्या चिभडा गावात वार्षिक २४,००० मेट्रिक टन (एमटी) क्षमतेचा हा प्रकल्प भारतात ६ गिगावॅट (जीडब्ल्यू) पर्यंत सौर ऊर्जा स्थापनेला वीज आणि आधार देऊ शकतो. या प्रकल्पाचे उद्घाटन शुक्रवार ४ जुलै, २०२५ रोजी केंद्रीय जलशक्ती मंत्री आर. पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी वरिष्ठ सरकारी अधिकारी, कंपनीचे नेतृत्व पथक आणि आमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

**केंद्रीय मंत्री आर. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन**




कंपनीने २८,००० चौरस मीटरच्या अत्याधुनिक आणि सौर पॅनेल ल्युमिनियम फ्रेमसाठी सर्वात प्रगत प्रकल्पांपैकी एक असलेल्या या प्रकल्पात सुमारे १५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. या प्रकल्पातून जून २०२५ मध्ये चाचणी उत्पादन सुरू झाले असून एका महिन्यात व्यावसायिक उत्पादन सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. पूर्ण क्षमतेने हा प्रकल्प दरवर्षी ७००-७५० कोटी रुपयांची विक्री करेल. या प्रकल्पामुळे सुमारे ३०० हून अधिक लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

प्रकल्पाबाबत अधिक माहिती देताना एच अँड एच ल्युमिनियमचे संचालक उत्तम पटेल म्हणाले, देशातील हा सर्वात मोठा आणि सर्वात प्रगत सोलर पॅनेल ल्युमिनियम फ्रेम प्रकल्प असेल. आम्ही फक्त एका वर्षाच्या विक्रमी वेळेत हा प्रकल्प स्थापित करू शकलो, असे सांगून राज्य सरकार आणि सर्व संबंधित विभागांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार व्यक्त करतो. सध्या, भारत ९० ते ९५ टक्के ल्युमिनियम सोलर पॅनेल फ्रेम आयात करतो. या प्रकल्पाद्वारे, आम्ही 'मेक इन इंडिया' उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी आणि सौर ऊर्जा क्षेत्रात देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी एक अर्थपूर्ण पाऊल उचलत आहोत. पुढील एका महिन्यात व्यावसायिक उत्पादन सुरू होईल अशी आमची अपेक्षा आहे.

२९ सप्टेंबर २०२४ रोजी, देशांतर्गत उद्योगाचे रक्षण करण्यासाठी भारत सरकारने चीन पीआरमध्ये उद्भवणाऱ्या किंवा निर्यात होणाऱ्या सौर पॅनेल/मॉड्यूलसाठी ॲनोडाइज्ड ल्युमिनियम फ्रेम्स च्या आयातीवर पाच वर्षांच्या कालावधीसाठी अँटी-डम्पिंग शुल्क लादले. परिणामी, विशिष्ट चिनी उत्पादक/निर्यातदार आणि इतर कोणत्याही निर्दिष्ट नसलेल्या संस्थांकडून आयात केल्या जाणाऱ्या आयातीवर प्रति मेट्रिक टन ४०३ ते ५७७ (१४% च्या समतुल्य) पर्यंत अँटी-डम्पिंग शुल्क आकारले जाते. अधिसूचनेच्या तारखेपासून पाच वर्षांसाठी हे शुल्क लागू आहे.

कंपनीचे संचालक विजय कनेरिया म्हणाले, भारताने २०२५ मध्ये १०० गिगावॅट सौरऊर्जा क्षमतेचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. याव्यतिरिक्त, सरकारने २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षयऊर्जा क्षमतेचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले असून ज्याचा एक महत्त्वाचा भाग, अंदाजे २८० गिगावॅट सौरऊर्जेपासून मिळण्याची अपेक्षा आहे. पुढील ५-१० वर्षांत सौरऊर्जा आणि संबंधित उद्योगांसाठी ही एक मोठी संधी आहे.

# एसएसआय मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट यात्रेचा भारत दौरा सुरू




**नागपूर, दि. ०५ जुलै :** भारतातील पहिली आणि एकमेव स्वदेशी विकसित सर्जिकल रोबोटिक प्रणाली असलेल्या एसएसआय मंत्राच्या उत्पादक एसएस इनोव्हेशन्सने आज गुरुग्राम येथील त्यांच्या मुख्यालयातून एसएसआय मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. या रोड शोचे उद्घाटन हरियाणा सरकारचे उद्योग आणि वाणिज्य मंत्री श्री राव नरबीर सिंह यांनी केले. एसएसआय मंत्रा एम सर्जिकल रोबोट यात्रेसह भारताने आरोग्यसेवेत एका परिवर्तनकारी प्रवासाला सुरुवात केली आहे. याअंतर्गत पहिल्या मोबाईल रोबोटिक सर्जरी प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक युनिटचे अनावरण देखील करण्यात आले. या अत्याधुनिक 'टेलीसर्जरी-ऑन-व्हील्स' उपक्रमामुळे देशभरातील रुग्णालये आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांना प्रगत शस्त्रक्रिया तंत्रज्ञान आणि कौशल्य निर्मितीच्या संधी थेट उपलब्ध होतील. राजस्थानमधील प्रवासातील पहिल्या टप्प्यात १५०० किमीच्या अंतरात ५०० हून अधिक डॉक्टरांना प्रशिक्षण आणि शिकण्याच्या संधी प्रदान केल्या जातील.

राजस्थानमधील पहिल्या टप्प्यात एसएसआय मंत्रा एमचा प्रवास ३ आणि ४ जुलै रोजी जयपूर येथील एसएमएस मेडिकल कॉलेज येथून सुरू होईल. येथे वैद्यकीय समुदायासाठी थेट प्रात्यक्षिके आणि परस्परसंवादी प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातील. मंत्रा एम ४ जुलै रोजी दुपारी एम्स जोधपूरला पोहोचेल. या यात्रेत ६ जुलैपर्यंत रफकॉनमध्ये सहभागी होणार आहे. ६ जुलै रोजी संध्याकाळी ते मथुरा दास माथुर मेडिकल कॉलेजला रवाना होईल आणि ७ जुलै रोजी येथे विविध सत्रे होतील. राजस्थानचा हा टप्पा ८ जुलै रोजी अजमेर येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजमध्ये संपेल. यांनतर ही यात्रा पुन्हा गुरुग्रामला परत येईल.

मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट प्रवासाच्या शुभारंभाबद्दल बोलताना, एसएस इनोव्हेशन्सचे संस्थापक अध्यक्ष आणि सीईओ डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, एसएसआय मंत्रा एम हे केवळ एक मोबाईल रोबोटिक प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक युनिट नसून ते जागतिक दर्जाचे शस्त्रक्रिया शिक्षण आणि नवोपक्रम सुलभ करण्यासाठीची एक राष्ट्रीय चळवळ आहे. मल्टी सिटी रोड शोच्या शुभारंभासह ही यात्रा आरोग्यसेवेतील भौगोलिक अडथळे दूर करताना सर्जिकल रोबोटिक्समधील भारताच्या स्वदेशी क्षमतांचे प्रदर्शन करेल.

हरियाणा सरकारचे माननीय उद्योग आणि वाणिज्य मंत्री श्री राव नरबीर सिंह म्हणाले, एसएस इनोव्हेशन्स ही हरियाणास्थित कंपनी आहे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. एसएसआय मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट यात्रा ही आपल्या देशातील तांत्रिक आणि वैद्यकीय नवोपक्रमाचे एक उत्तम उदाहरण आहे.

# मनिका प्लास्टेक लि. या कंपनी तर्फे सेबी कडे आयपीओ साठी डीआरएचपी दाखल

**मुंबई, दि. ०५ जुलै :** मनिका प्लास्टेक लिमिटेड ही डिझाईन-केंद्रित, अचूकतेने अभियांत्रिकी केलेली, कठीण स्वरूपाची (रिजिड) पॉलिमर पॅकेजिंग उत्पादने तयार करणारी कंपनी असून तिने प्राथमिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) सेबीकडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीएचआरपी) दाखल केला आहे.

या प्राथमिक समभाग विक्रीमध्ये कंपनीचे२ रुपये दर्शनी मूल्याचे ११५ कोटी रुपयांच्या नवीन समभागांचा (फ्रेश इश्शू) तसेच प्रवर्तक 'वृदा होल्डिंग ट्रस्ट'कडील एकूण १.५ कोटी समभागांच्याविक्रीसाठीचा प्रस्ताव (ऑफर फॉर सेल ओएफएस) आहे.

निकुंज मोहनलाल कपाडिया, मुंजाल निकुंज कपाडिया, मिहीर निकुंज कपाडिया, प्रतीक निकुंज कपाडिया आणि वृदा होल्डिंग ट्रस्ट हे कंपनीचे प्रमुख प्रवर्तक आहेत.

मनिका प्लास्टेक लिमिटेड ही कंपनी ऊर्जा साठवण, दुग्धजन्य व खाद्यपदार्थ, पेन्ट्स, रसायने अशा विविध महत्त्वाच्या उद्योगांसाठी डिझाईन-केंद्रित आणि अचूक अभियांत्रिकी पद्धतीने तयार केलेली पॉलिमर पॅकेजिंगची कठीण उत्पादने पुरवते. कंपनीच्या उत्पादनांचे डिझाईन आणि विकास स्वतःच्या संशोधन व विकास विभागात होतो. कंपनीने डिझाईन्स ॲक्ट, २००० आणि डिझाईन्स रूल्स, २००१ अंतर्गत ३६ डिझाईन्स नोंदवलेली आहेत. त्यातील दोन डिझाईन्स नूतनीकरणासाठी अर्जित आहेत. (संदर्भ: टेक्नोपॅक अहवाल)

विशिष्ट कामगिरी, टिकाऊपणा, उत्पादन सुरक्षितता व कार्यक्षमतेवर लक्ष केंद्रित करत, मणिका प्लास्टेक लिमिटेडने अचूक अभियांत्रिकीवर आधारलेलाआपला उत्पादन पोर्टफोलिओ विकसित केला आहे. यामध्ये हाय-परफॉर्मन्स बॅटरी केसिंग्ज, पेल्स आणि थिनवॉल कंटेनर्स यांचा समावेश आहे. औद्योगिक आणि इतरकारांसाठी ही उत्पादने वापरण्यात येतात. ही उत्पादने वाहन उद्योग, ऊर्जा साठवण, टेलिकॉम, पेंट्स, ल्युब्रिकंट्स, कृषी रसायने, अन्नप्रक्रिया आणि दुग्धजन्य उत्पादने यांसारख्या विविध क्षेत्रांना पुरवली जातात. प्रिसीजन बॅटरी केसिंग्ज, पेल्स आणि थिनवॉल कंटेनर्स असे रिजिड पॉलिमर घटक इंजेक्शन मोल्डिंग तंत्रज्ञानाने कंपनी तयार करते.

आयपीओतून मिळणारा निधीकारखाना व यंत्रसामग्री खरेदीसारख्या भांडवली खर्चासाठी, काही कर्जांची संपूर्ण किंवा अंशतः परतफेड वा पूर्व-परतफेडकरण्यासाठी, तसेच इतर सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरण्याचा कंपनीचा मानस आहे.

कंपनी आयएसबीएम (इंजेक्शन स्ट्रेच ब्लो मोल्डिंग) तंत्रज्ञानाचा वापर करून पीईटी बाटल्या, जार्स, कंटेनर्स यांसारखी उत्पादने तयार करणार आहे. ही उत्पादने पर्सनल केअर, सौंदर्यप्रसाधने, पेय पदार्थ आणि औषधउद्योग यांसारख्या क्षेत्रांसाठी असतील.

सन २०२३या कॅलेंडर वर्षात / २०२४ याआर्थिक वर्षात, मणिका प्लास्टेक लि. ही पर्यावरणपूरकतेवर भर देऊन पुनर्वापर केलेल्या प्लास्टिकमधून मोठ्या प्रमाणात उत्पादन करणाऱ्या प्रमुख कंपन्यांपैकी एक गणली गेली आहे. कंपनीपुनर्वापर करण्याजोग्या व पर्यावरणपूरक साहित्याचा वापरकरते, तसेचऊर्जासक्षम उत्पादन प्रक्रियाअवलंबते. (संदर्भ: टेक्नोपॅक अहवाल) कंपनीचे डिसेंबर २०२४ पर्यंतचे ९ महिन्यांचे उत्पन्न३०१.७५ कोटी रुपये आहे.

# लोपॅथी आणि योगाचे संयोजन: उपचारांच्या यशाच्या दरात वाढ



**नागपूर, दि. ०५ जुलै :** योग हा केवळ एक सांस्कृतिक उत्सव नाही, तर आधुनिक जीवनशैलीत आरोग्य मिळविण्याचे एक वैज्ञानिक साधन बनले आहे. वैद्यकीय दृष्टिकोनातून, अनेक रोगांचे प्रतिबंध आणि व्यवस्थापन करण्यासाठी योग खूप प्रभावी ठरत आहे. डॉ. अमर आमले, एमबीबीएस, एमडी मेडिसिन, डीएनबी कार्डिओलॉजी, इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजी नागपूर म्हणाले, योग हे केवळ शरीराला लवचिक बनवण्याचे साधन नाही तर ते आपले मन आणि आत्मा देखील संतुलित करते. आजच्या धावपळीच्या जीवनात, आपल्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करणे ही काळाची गरज आहे.

हे सिद्ध करण्यासाठी, शहरात एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये रुग्णांसह सामान्य नागरिकांसाठी योग प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाद्वारे, सर्व सहभागींना शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीचे महत्त्व समजून घेण्याची आणि योगाद्वारे ती बळकट करण्याची संधी मिळाली. प्रशिक्षण सत्र एका प्रमाणित योग प्रशिक्षकाने आयोजित केले होते, ज्यामुळे सहभागींना वैज्ञानिक दृष्टिकोनातून योगाच्या पद्धती आणि फायदे जाणून घेण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांमुळे लोकांना केवळ जागरूकता येत नाही तर त्यांना चांगली जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा मिळते. डॉ. आमले असेही म्हणाले की, सध्याच्या जीवनशैलीतील ताण, असंतुलित आहार आणि अनियमित दिनचर्येमुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि मानसिक विकार यासारखे आजार वेगाने वाढत आहेत. वैद्यकीय शास्त्रातील अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे की नियमित योगसाधना या समस्यांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकते आणि त्यामुळे जीवनाची गुणवत्ता देखील सुधारते. प्राणायाम आणि ध्यान यासारख्या योगाभ्यासांमुळे केवळ हृदयाचे ठोके संतुलित होतात आणि रक्तदाब नियंत्रित होतोच, शिवाय तणाव संप्रेरक (कॉर्टिसोल) ची पातळी देखील कमी होते. यामुळे हृदय निरोगी राहते आणि मानसिक शांती मिळते.

# शॅडोफॅक्स टेक्नॉलॉजीज लिमिटेडतर्फे २,५०० कोटी रु. च्या आयपीओसाठी सेबीकडे गोपनीय डीआरएचपी सादर

**मुंबई, दि. ०५ जुलै :** भारतातील आघाडीची लॉजिस्टिक्स सेवा पुरवठादार कंपनी शॅडोफॅक्स टेक्नॉलॉजीज लिमिटेडने प्राथमिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडे गोपनीय ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस सादर केला आहे.

स्रोतांच्या माहितीनुसार, आयपीओचे एकूण मूल्य २,००० रु. २,५०० कोटी रु. च्या दरम्यान असण्याची शक्यता आहे. यामध्ये फ्रेश इश्यू आणि विद्यमान भागधारकांकडून ऑफर फॉर सेल (ओएफएस) यांचा समावेश आहे. कंपनीचे मूल्य सुमारे८,५०० कोटी रु. इतके असण्याची अपेक्षा आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या शेवटच्या निधी उभारणीमध्येकंपनीने सुमारे ६,००० कोटी रु. च्या अंदाजे मूल्यांकनावर प्रायमरी आणि सेकंडरी भांडवल उभारले होते.

स्रोतांच्या मते, फ्रेश इश्यूतून मिळणारी रक्कम कंपनीच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी, वाढीला चालना देण्यासाठी आणि नेटवर्क व्यवसायामध्ये पुढील गुंतवणूक करण्यासाठी वापरण्याचा कंपनीचा मानस आहे.

ई-कॉमर्सविभाग हा कंपनीच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असून सुमारे ७५% व्यवसाय याच विभागातून येतो. उर्वरित उत्पन्न क्विक कॉमर्स आणि हायपरलोकल डिलिव्हरी मधून येते.

शॅडोफॅक्सला फ्लिपकार्ट, टीपीजी, एट रोड्स व्हेंचर्स, मिराई ॲसेट व्हेंचर्स आणि नोकिया ग्रोथ फंड्सयांसारख्या आघाडीच्या गुंतवणूकदारांचे पाठबळ आहे.

शॅडोफॅक्स भारतातील ई-कॉमर्स एक्सप्रेस पार्सल आणि मूल्यवर्धित सेवांसाठी आघाडीची लॉजिस्टिक्स सेवा पुरवठादार कंपनी आहे. शॅडोफॅक्सने २,२०० हून अधिक शहरांमध्ये आणि १४,३०० पेक्षा अधिक पिन कोड्समध्ये विस्तारलेल्या मजबूत वितरण नेटवर्कसहलॉजिस्टिक्स उद्योगामध्ये आपली बाजारपेठेतील आघाडीची भूमिका प्रस्थापित केली आहे.

# क्योर फूड्स इंडिया लिमिटेडने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

**मुंबई, दि. ०५ जुलै :** क्योर फूड्स इंडिया लिमिटेड ही ग्राहक पसंती आणि आहार गरजांना पूरक अशा व्यापक खाद्यपदार्थांची सेवा पुरविणारी इंटरनेट आधारित मल्टी-ब्रँड फूड सर्व्हिसेस कंपनी आहे. कंपनीने आपले ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) मार्केट रेग्युलेटर सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांच्याकडे दाखल केले आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंतच्या स्थितीनुसार, क्योरफूड्स ही आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ऑपरेशन्समधून मिळालेल्या महसुलाच्या आधारे (फूड डिलिव्हरी मार्केटप्लेस वगळून) भारतातील दुसऱ्या क्रमांकाची डिजिटल-फर्स्ट फूड सर्व्हिसेस कंपनी आहे.

ही ऑफर छ१ दर्शनी मूल्याच्या नवीन शेअर्सच्या इश्यूमधून एकूण छ८,०००.०० मिलियन इतकी रक्कम उभारणाऱ्या नवीन इश्यूचा आणि ४८,५३७,५९९ इक्विटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेलचा समावेश करते. या ऑफर फॉर सेलमध्ये आयर्न पिलर पीसीसी (आयर्न पिलर पीसीसी सेल सी आणि सेल ई यांच्या वतीने) कडून १९,०८८,६७० शेअर्स, क्रिमसन विंटर लिमिटेडकडून ९,७५९,६६० शेअर्स, ॲक्सेल इंडिया व्ही (मॉरिशस) लिमिटेड कडून ४,५७५,३३० शेअर्स, चिराटे व्हेंचर्स इंडिया फंड फोरकडून ३,६६६,०२० शेअर्स, ग्लोबल ई-कॉमर्स कॉन्सॉलिडेशन फंड एल.पी. कडून ३,५२४,२१३ शेअर्स, चिराटे व्हेंचर्स मास्टर फंड फोर कडून २,७९०,६१९ शेअर्स, अल्टेरिया कॅपिटल फंड टू स्कीम वन कडून १,४३१,१५० शेअर्स, क्योरफिट हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड कडून १,२८१,५१० शेअर्स, श्रीपाद श्रीकृष्ण नाडकर्णीकडून १,१५४,४९० शेअर्स, होरायझन टेक्नो प्रायव्हेट लिमिटेडकडून ९३०,९०० शेअर्स आणि झेफायर पीकॉक इंडिया ग्रोथ फंडकडून ३३५,०३७ शेअर्सचा समावेश आहे; हे सर्व विक्री करणारे भागधारक (सेलिंग शेअरहोल्डर्स) म्हणून ओळखले जातात.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरचा छत्रपती संभाजीनगरात नवीन सिटी ऑफिसचा शुभारंभ




**मुंबई, दि. ०५ जुलै :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर (सीएसएन) येथे त्यांच्या नवीन सिटी ऑफिसचे उद्घाटन केल्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील उपस्थिती बळकट करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, भारताच्या ऑटोमोबाईल उद्योगात योगदान देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार यातून होतो.

जुलै २०२४ मध्ये टीकेएम आणि महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानंतर (एमओयु) ही विकास प्रक्रिया सुरू झाली. या कराराचा उद्देश या भागात एक ग्रीनफिल्ड उत्पादन सुविधा उभारण्याचा आहे. छत्रपती संभाजीनगरमधील हे नवीन कार्यालय टीकेएमच्या प्रादेशिक कामकाजासाठी एक महत्त्वपूर्ण केंद्र ठरणार आहे, जे औद्योगिक विकास, टिकावू प्रगती, कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण आणि समाजासाठी योगदान यावर लक्ष केंद्रित करेल.

चिकलठाणा येथील प्रोझोन मॉलजवळ असलेल्या एबीसी इस्ट या ठिकाणी वसलेले हे ७००० चौरस फूट क्षेत्रफळ असलेले कार्यालय श्री. मासाकाझू योशिमुरा (चेअरमन, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, टीकेएम) आणि श्री. स्वप्नेश मारू (उप-व्यवस्थापकीय संचालक कॉर्पोरेट प्लॅनिंग, ग्रीन फील्ड प्रकल्प) यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटनप्रसंगी श्री. स्वप्नेश मारू म्हणाले, छत्रपती संभाजीनगरातील आमच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन प्रादेशिक पातळीवर बाजारपेठेतील सहभाग वाढवण्यासाठी आणि स्थानिक हितधारकांशी दृढ संबंध प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. जागतिक दर्जाच्या उत्पादन क्षमतेसह मराठवाड्यात रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि समावेशी प्रगती घडवून आणण्याच्या आमच्या वचनबद्धतेतून हे पाऊल पुढे टाकण्यात आले आहे.

# शब्दकोडे क्रमांक २१५७




**आडवे शब्द :-**
१) संसाराबद्दलची ममता
५) दावा, हक्क सांगणारा
८) मच्छर
१०) शुभ्र, पांढरा
११) तिरळा
१२) नारळ खवण्याचे साधन
१४) लक्ष्मी
१६) देणारा
१७) नवरा(ग्रा)
१८) वाघ-सिंहाची गर्जना
१९) अंगात येणे, फुरसत
२१) शेतातील पहाऱ्याची जागा
२३) उपरा, आपला नसलेला
२५) होडी, सैन्याचा तळ
२६) वाद्य वाजविणारा
२७) चावट
२८) बाजेची सुती पट्टी
२९) दरोडेखोर
३१) अत्तराचा बोळा
३२) तोफगाडी
३३) यजमान, नवरा
३५) जाड झालेली केसांची बट
३६) तात्पर्य
३७) दुष्ट
३९) देऊळ
४१) नवा कोरा
४२) पूर्णपणे, निर्भेळ, स्वच्छ
४३) तफावत, फरक
४५) समईतील कापसाची वळी
४६) पृथ्वी
४८) वेळ मोजणे
५१) गणपती
५३) तोरा, पत, अब्रू
५४) उपद्रव माजोरीपणा
५५) हिंमत, धैर्य
५६) चटकन, त्वरित
५८) साखर
५९) कमळ
६१) टरफल
६२) बशीचा जोडीदार
६४) लीलावती ह्या गणितीग्रंथ लिहिणारे मुनी
६६) पर्वत
६८) फणसाची एक जात
७०) चित्रपटाचा पडदा
७३) अंत:करण
७५) मंदवासर
७६) दमणे
७७) गोष्टी सांगणे

**उभे शब्द :-**
२) दोन आठवड्याचा काळ
३) स्वाद, रुची
४) श्रीमंत
५) पांगापांग, वाताहत
६) प्रमाणपत्र
७) आवाज
९) राजवाडा
१३) आवडता, प्रिय
१५) बागवान
१९) गुन्हा
२०) अवकाश
२१) सहाय्य
२२) चक्र
२४) पाणी उकळतानाचा आवाज
२६) खराब
२७) व्यर्थ
२८) नगारा वगैरे वाद्य ठेवण्याची जागा
३०) अंजन
३१) घटस्फोट
३४) वर वधूची मिरवणूक
३६) उंट हाकणारा
३७) धोकादायक
३८) विशेष बातमी
४०) आवराआवर
४३) सुरमा लावण्याची धातूची कांडी
४४) मोठा नगारा
४७) मलई
४९) वाईट सवय, खोड
५०) बेचव, पातळसर
५१) काहीही सुचत नसण्याची स्थिती
५२) मनाचा ओढा
५३) समजणे, लक्षात येणे
५७) व्रत
६०) अकस्मात
६३) उद्याच्या नंतरचा दिवस
६४) भाडे, मजुरी
६५) कौसल्यापुत्र
६७) प्रस्थान करणे
६९) बंधन
७१) सोन्याचा धागा
७२) रस्ता
७४) छिद्र

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**




# तु जळी, तु स्थळी, तु पाषाणी विठ्ठला!

## कौंडण्यपूरसह जिल्ह्यातील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )-** आषाढी एकादशीनिमित्त रविवारी श्री क्षेत्र कौंडण्यपूरसह जिल्ह्यातील सर्व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये भक्तांची मोठी गर्दी उसळली. पहाटेपासूनच मंदिरांमध्ये दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. जय हरी विठ्ठल च्या गजरात वातावरण भक्तिमय झाले होते. तु जळी, तु स्थळी, तु पाषाणी विठ्ठला! असे भजन गात भाविकांनी विठ्ठलाला हाक मारली. कौंडण्यपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी संस्थानात महाअभिषेक व महापूजा पार पडली. यानंतर भजन-कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वऱ्हा, कुऱ्हा, अंजनवती, मार्डा, भिवापूर, शेंदुरजना खुर्द, नांदपूर अशा अनेक गावांतील कीर्तन मंडळांनी सहभाग घेतला. भाविकांना फराळाचा महाप्रसाद वितरित करण्यात आला. कौंडण्यपूरचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, रुक्मिणी मातेची पालखी, आणि संत सदाराम महाराजांची समाधी विशेष आकर्षण ठरतात. येथे मंदिरात प्रवेश करताच पंढरपूरसारखा अनुभव



भाविकांना येतो, म्हणून या ठिकाणाला प्रति पंढरपूर म्हणतात.431 वर्षांची परंपरा असलेली दिंडी यात्रा यावर्षीही कौंडण्यपूरहून पंढरपूरकडे रवाना झाली होती. ही पालखी 1 जून रोजी निघून 33 दिवसांचा प्रवास करत 3 जुलै रोजी पंढरपूरला पोहोचली. दिंडीचे आयोजन संत सदाराम महाराजांनी 1594 मध्ये सुरू केले होते आणि यावर्षी हे 431 वे वर्ष आहे.वारकरी भजन, गायन आणि हरिनाम संकीर्तन करत अमरावती, वाशीम, हिंगोली, परभणी, बीड, धाराशिव, सोलापूर मार्गे पंढरपूर येथे पोहचले. या पारंपरिक दिंडी यात्रेने आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व अधिक अधोरेखित केले.







## अमरावतीकरांनी अनुभवला पंढरीचा आनंद

**अमरावती** - आषाढी एकादशीनिमित्त अमरावतीतील कॉटन ग्रीन कॉलनी व व्हि. एम. व्हि. परिसरातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी पहाटेपासूनच पाहायला मिळाली. मंदिरात आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. भाविक भक्तांसाठी साबुदाणा उसळ व फराळ वाटप करण्यात आले. यावेळी अमरावतीकरांनी पंढरपूराचा आनंद अनुभवला.

गाडगे नगर परिसरात आषाढी उत्सव समितीच्या वतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची देखणी सजावट आणि बेलोरा येथून आलेल्या दिंडीने कार्यक्रमात उत्साह आणला. यावेळी पंढरपूर मंदिरातील थेट प्रक्षेपण देखील दाखवण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांना पंढरपूरच्या वारीचा अनुभव मिळाला. महाआरतीचे यजमान शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश संजय खोडके होते. कार्यक्रमाला अनिकेत देशमुख, प्रशांत धर्माळे, राजाराम प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख तसेच परिसरातील अनेक युवकांची उपस्थिती होती. या वेळी 2 क्विंटल साबुदाण्याच्या उसळीचे वाटप करण्यात आले. संपूर्ण परिसरात धार्मिकतेचे वातावरण निर्माण झाले होते. भाविकांच्या हरिनाम संकीर्तनाने परिसर पंढरपूरप्रमाणे भासत होता. भाविकांनी उत्सवाचा आनंद व पुण्य मोठ्या संख्येने घेतला.

## आषाढी एकादशीनिमित्त आमदार सुलभा खोडकेंकडून भक्तीमय वारीत सहभाग

**अमरावती** - आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने आमदार सुलभा संजय खोडके यांनी सदिच्छा कॉलनी, विनायक नगर येथील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर, तसेच आसरामाता विठ्ठल मंदिर, यशोदा नगर येथे विठ्ठल-रुख्मिणीचे दर्शन घेऊन विश्वमांगल्याची प्रार्थना केली.

कार्यक्रमात बोलताना आमदार खोडके म्हणाल्या, वारी म्हणजे भक्ती, समर्पण आणि सामूहिक चेतनेचा लोभस प्रवास आहे. पंढरपूरची वारी ही केवळ धार्मिक विधी नसून, ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनाचा श्वास आहे. या वारीमुळे सामाजिक ऐक्य दृढ होते आणि भक्तीची ऊर्जा निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले. विठ्ठलाच्या प्रतिमेस पूजन, वंदन, माल्यार्पण करत त्यांनी विठुरायाच्या चरणी विश्वमंगलाची प्रार्थना केली. त्यानंतर त्यांचा मंदिर समितीच्या



वतीने शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यशोदा नगर येथील आसरामाता विठ्ठल मंदिरातही त्यांनी दर्शन घेऊन भाविकांसाठी प्रार्थना केली. यावेळी भाविक भक्तांसाठी उसळ, फराळ व फलाहाराचे वाटप करण्यात आले.या उत्सवात टाळ-मृदंगाचा गजर, हरीनामाचा जयघोष यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमात आमदार संजय खोडके, सदाशिवराव चिंचे, वामनराव खरबडे, विजयराव भुयार, व इतर मान्यवर तसेच शेकडो भाविक उपस्थित होते. शासकीय तंत्रनिकेतनजवळील आषाढी उत्सव समितीच्या कार्यक्रमातही खोडके दांपत्याने विठ्ठल प्रतिमेस माल्यार्पण करून दर्शन घेतले.

## गावोगावी मंदिरात आषाढी एकादशी उत्सव

**मोर्शी** - आज आषाढी एकादशीच्या दिवशी तालुक्यातील विविध मंदिरांमध्ये विठ्ठल-रुक्मिणीची पूजा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात पार पडली. पहाटेपासूनच भक्तांनी मंदिरात गर्दी केली होती. स्थानिक असराणी लेआउट मध्ये श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात हरिपाठ, महिला मंडळींचे भजन, कीर्तन यांचे आयोजन करण्यात आले. सकाळी विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. यावेळी श्रीमान सराफ महाराज यांनी पौरोहित्य केले. यावेळी श्रीमान सराफ महाराजांनी सांगितले की आषाढी एकादशी, ज्याला देवशयनी एकादशी म्हणूनही ओळखले जाते, हा एक महत्वाचा हिंदू सण आहे. हा दिवस आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला येतो. या दिवशी, भगवान विष्णू चार महिन्यांसाठी योगनिद्रा (निद्रा) घेतात, अशी धार्मिक समजूत आहे. यामुळे



चातुर्मासाला सुरुवात होते. या दिवसाचे आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्ट्या खूप महत्व आहे. काही ठिकाणी पालखी यात्रा काढण्यात आली. सुंदर फुला फळांची आरास मांडून विठ्ठल भक्तांनी 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल'च्या जयघोषात दर्शन घेतले.लोकांनी एकत्र येऊन सामूहिक फराळाचे आयोजन केले. दिवसभर महिलांचा आणि युवकांचा विठ्ठल दर्शनासाठी उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.



## भक्तांना भक्तिमय शुभेच्छा आणि उसळ वाटप

**अमरावती** - आषाढी एकादशीच्या पावन दिवशी यश सुलभा संजय खोडके यांनी अमरावतीतील विविध ठिकाणी भाविक भक्तांना भक्तिमय शुभेच्छा दिल्या व उसळ वाटप करून आपली सामाजिक आणि धार्मिक बांधिलकी जपली.

यश खोडके यांनी याप्रसंगी भगवान विठ्ठलाच्या प्रतिमेस पूजन, वंदन व माल्यार्पण करून भाविक भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थना केली. त्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने भगवान विठ्ठलाची आरती करत भक्तिभाव व्यक्त केला.शासकीय तंत्रनिकेतन, गाडगे नगर जवळील आषाढी एकादशी उत्सव समितीच्या वतीने आयोजित उसळ वाटप कार्यक्रमात तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक, रहाटगाव ङ्क रिंग रोड येथे संकेत महल्ले मित्र मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमात यश खोडकेंच्या हस्ते उसळ वाटप करण्यात आले.

यावेळी यश खोडके म्हणाले, आषाढी एकादशी हे वारकरी संप्रदायाचे महान पर्व असून, विठ्ठल भक्तीचा हा सोहळा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. या पावन दिवशी मी आणि माझ्या कुटुंबियांच्या वतीने सर्व भाविकांना भक्तिमय शुभेच्छा देतो. या उत्सवात टाळ-मृदंगाचा गजर, हरीनामाचा जयघोष आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. गाडगे नगर येथील उत्सव समितीचे सदस्य व संकेत महल्ले मित्र मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पंढरपूरची वारी, संतांच्या पालख्यांमधून प्रवाहित होणारी भक्तीची ऊर्जा आणि विठुरायाच्या चरणी अर्पण करण्यात आलेली श्रद्धा यामुळे हा दिवस खऱ्या अर्थाने चैतन्याचा, भक्तीचा आणि सामूहिक श्रद्धेचा उत्सव ठरला.

## जिल्ह्यात रब्बी हंगामातील ज्वारी खरेदीसाठी खासदार बळवंत वानखडे यांचा पाठपुरावा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** - अमरावती जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पारंपरिक पिक असलेल्या ज्वारीचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले आहे. या हंगामात हवामान पोषक ठरल्याने उत्पादन चांगले झाले असून, शेतकरी ज्वारी विक्रीसाठी उत्सुक आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडे आपल्या ज्वारीच्या विक्रीसाठी नोंदणी केली आहे. मात्र, अद्याप शासकीय खरेदी प्रक्रिया सुरु न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या खाजगी बाजारपेठेत ज्वारीला 1200 ते 1500 रुपये दर मिळत आहे. याउलट सन 2024-25 या वर्षासाठी शासनाने हमीभाव जाहीर केला असून,



संकरित ज्वारीला 3180 रुपये व मालदांडी ज्वारीला 3225 रुपये प्रतिक्विंटल इतका हमीभाव निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल शासकीय खरेदीकडे अधिक आहे. खासदार बळवंत वानखडे यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे यांची नागपूर येथील कार्यालयात भेट घेऊन शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत ज्वारीची तात्काळ खरेदी करण्याची लेखी मागणी केली. तसेच दिनांक 30 जून 2025 रोजी त्यांनी अमरावती जिल्हाधिकारी यांनाही याबाबतचे निवेदन सादर केले. शेतकऱ्यांवर खरीप हंगामाचे काम सुरु असल्याने तातडीने ज्वारी खरेदी होणे आवश्यक आहे. यामुळे त्यांना आर्थिक मदत मिळून नवीन पीक तयारीसाठी आधार मिळू शकतो. ही बाब लक्षात घेता पालकमंत्री बावनकुळे यांनी मंत्रालय, मुंबई येथे पणन विभागाच्या सचिवांसमवेत बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले आहे. या बैठकीत ज्वारी खरेदी प्रक्रिया सुरु करण्यासाठी आवश्यक निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.शेतकऱ्यांच्या हितासाठी खासदार बळवंत वानखडे यांचा हा सकारात्मक पाठपुरावा लवकरच प्रत्यक्षात येऊन ज्वारी खरेदीस गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## साक्षी खंडेलवाल राजस्थानी समाजातील पहिली महिला चार्टर्ड अकाउंटंट

**वरुड,( दि.6 )-** शहरातील प्रतिष्ठित व्यापारी तसेच युनायटेड आटोचे संचालक नरेंद्र खंडेलवाल यांची नात व दुर्गेश खंडेलवाल यांची मुलगी साक्षी हिने 2025 मध्ये सी.ए.च्या अंतिम वर्षाची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे वरुड तालुक्यातील राजस्थानी समाजातून सी.ए. होणारी पहिली महिला होण्याचा मान तिने पटकावला आहे. साक्षीच्या या यशाबद्दल संपूर्ण समाज व विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्राप्त माहितीनुसार, साक्षीने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण वरुडमधील न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट स्कूलमधून पूर्ण करत दहावीत 95 टक्के गुण मिळवले. त्यानंतर तिने कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण एन.टी.आर. विद्यालयातून पूर्ण करत बारावीत 84 टक्के गुण



मिळवले. आय.पी.सी.सी.चा पहिला गट तिने 2021 मध्ये उत्तीर्ण केला व अखेर 2025 मध्ये सी.ए.च्या अंतिम परीक्षेतही यश मिळवून तिच्या कठोर परिश्रमाचे फलित सिद्ध केले.साक्षी खंडेलवालने तिच्या यशाचे श्रेय तिच्या आजी सुमन, आजोबा नरेंद्र, आई लक्ष्मी, वडील दुर्गेश, काका हरीश तसेच संपूर्ण कुटुंबीयांना दिले आहे.

### कैलास नवखरे यांचे अल्पशा आजाराने निधन

**अंजनगाव बारी** - अंजनगाव बारी येथील कैलास एकनाथराव नवखरे (42) वर्षे यांचे (ह.मु.पुणे) येथे अल्प आजाराने दि.6 जुलै सकाळी 10 वाजता येथे दु:खद निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी,एक मुलगा असा बराचसा आप्त परिवार आहे.



## धामणगाव रेल्वे शहरात विकासकामांचा भव्य लोकार्पण सोहळा

### आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते भूमिपूजन



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.6 )-** नगरपरिषदेच्या वतीने विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळे आमदार प्रताप अडसड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध निधीच्या माध्यमातून रस्ते सिमेंटिकरण, नाली बांधकाम, कुंपण भिंत, सभागृह उभारणी व बगीच्यांचे नूतनीकरण यांसारख्या विविध कामांचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी माधव सदाशिव गोळवलकर क्रीडांगण तसेच शहीद भगतसिंग, राजगुरू, आणि सुखदेव व्यायाम शाळेतील एकूण 85 लक्ष 4 हजार 670 रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण आमदार अडसड यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास नगरपरिषद मुख्याधिकारी पूनम कळंबे, विधानसभा निवडणूक प्रमुख रावसाहेब रोठे, गोपाल भैया, दर्शन राठी, बंडू पाटील, गिरीश भुतडा, प्रशांत बदनोरे, आनंद रॉय, नलिनी मेश्राम, उषा तिनखेडे, नरेंद्र चौधरी, मूलचंद गुप्ता यांच्यासह नगरपरिषदेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकासकामांच्या या लोकार्पण कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला आनंद व्यक्त केला. परिसरात सुरू झालेल्या कामांमुळे समाधान व्यक्त करत त्यांनी आमदार व नगरपरिषद प्रशासनाचे आभार मानले.

### उद्घाटन करण्यात आलेली काही महत्त्वाची कामे

- प्रभाग 6 अंतर्गत खेळाच्या मैदानाचे विकासकाम
- प्रभाग 5 व 6 मधील तिवरा रोड, श्रीराम कॉम्प्लेक्स, श्री बडगैया, रुक्मिणी बालमंदिर भागातील रस्ते सिमेंटिकरण व नाली बांधकाम
- प्रभाग 7, भोईपुरा येथे कुंपण भिंतीचे व नाली बांधकाम
- पनपालीया टायर्स ते पोलिस स्टेशन दरम्यान दोन्ही बाजूंनी रस्त्यांचे काँक्रिटीकरण
- विवेकानंद नगरमध्ये कुंपण भिंत
- प्रभाग 2 मध्ये माताजी मंदिर, दादाराव अडसड किंडरगार्टन येथे रस्ता व सभागृह बांधकाम
- शिवाजी चौकाजवळ काँक्रिटीकरण आणि दिनदयाल उपाध्याय बगीच्याचे नूतनीकरण
- अंजनसिंगी रोड, साई मंदिर आणि इतर भागांतील सिमेंट रस्ते व नाली बांधकाम

धामणगाव रेल्वे शहराचा सर्वांगीण विकास हे माझं सर्वोच्च प्राधान्य आहे. नागरिकांच्या गरजा ओळखून दर्जेदार विकासकामे करण्यासाठी आम्ही निधी मिळवण्यात यशस्वी झालो. येत्या काळात शहराच्या प्रत्येक भागात अशीच विकासकामे सुरू राहतील. जनतेचा विश्वास हीच माझी खरी ताकद आहे.

**प्रताप अडसड,**
**आमदार धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघ.**

## आमदार प्रताप अडसड यांची विधानसभेत शेतकरी हिताची ठाम मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.6 )** - राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन ज्वारी खरेदी पुन्हा सुरू करावी आणि सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी अभ्यासगट स्थापन करून सबसिडी द्यावी, अशी ठाम मागणी आमदार प्रताप अडसड यांनी विधानसभेत केली. विरोधकांनी मांडलेल्या 293 अन्वये प्रस्तावावर बोलताना आमदार अडसड यांनी कृषी विभागाशी संबंधित मुद्दे अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, नाफेडच्या माध्यमातून सुरू असलेली ज्वारी खरेदी पोर्टल बंद झाल्याने थांबली असून ती तात्काळ सुरू करावी. तसेच, सेंद्रिय शेतीसाठी अभ्यासगट स्थापन करून शेतकऱ्यांना अनुदान द्यावे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारचे पावले सांगताना अडसड म्हणाले की, महायुती सरकारने मोफत वीज देण्याचे वचन पूर्ण केले आहे. सोलर फिडरद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात असून 2,500 शेतकऱ्यांना याचा लाभ मिळत आहे. यावेळी काँग्रेसवर टीका करताना ते म्हणाले की, काँग्रेस अनेक वर्षे सत्तेत असूनही शेतकऱ्यांसाठी काही ठोस निर्णय घेतले नाहीत. आता मात्र मगरीचे अश्रू ढाळत आहेत. समृद्धी महामार्ग आणि सोफिया प्रकल्पासारख्या प्रकल्पांना विरोध करून नंतर स्वत:चा फायदा घेतला. अडसड यांनी पंप आणि रस्त्यांच्या मागण्याही केल्या. पंपासाठी वर्षानुवर्षे वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना सौर पंप तातडीने उपलब्ध करून द्यावेत, तसेच पांदन रस्त्यांसाठी मंजूर निधीतून कामे लवकर पूर्ण करावीत, असेही ते म्हणाले.

## आषाढी एकादशीचा उपवास द्वादशीला पारण करून सोडावा

### जाणून घ्या योग्य वेळ आणि आहार

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.6 )** - ज्येष्ठ महिन्यातील महत्त्वाच्या एकादशींपैकी एक असलेली आषाढी एकादशी आज श्रद्धापूर्वक साजरी करण्यात येत आहे. या निमित्ताने राज्यातील विविध विठ्ठल मंदिरांमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली आहे. आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हटले जाते.

हिंदू धर्मात प्रत्येक सणासह





व्रत-वैकल्यांनाही विशेष महत्त्व आहे. वर्षभर येणाऱ्या 24 एकादशींपैकी आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील ही एकादशी सर्वाधिक पवित्र मानली जाते. लाखो भाविक हे व्रत करत असून, यामुळे पुण्य प्राप्त होते व पापांपासून मुक्ती मिळते, असा श्रद्धावानांचा विश्वास आहे. या एकादशीचे व्रत आज (रविवार) पार पडल्यानंतर, उद्या सोमवारी (7 जुलै 2025) रोजी द्वादशीच्या दिवशी उपवास पारण करण्याची परंपरा आहे. पंचांगानुसार सकाळी 5.29 ते 8.16 या वेळेत उपवास सोडणे शुभ मानले जाते.

### उपवासानंतरचा आहार

उपवासानंतर चहा-बिस्कीट घेणे टाळावे. त्याऐवजी फळे, फ्रूट ज्यूस, भिजवलेले ड्रायफ्रूट्स, तसेच बटाटा, भात, गहू, ज्वारी यांचा हलका आहार घ्यावा. तिखट, तळलेले आणि मसालेदार पदार्थ टाळावेत. खीर, शिरा, उपमा, सूप यांसारखे पदार्थ उपयुक्त ठरतात. खिरीत शक्यतो गूळाचा वापर करावा, असे आहारतज्ज्ञ सांगतात. वारकरी संप्रदायात विशेष स्थान असलेली आषाढी एकादशी भक्तिभावाने साजरी होत असून, अनेक भाविक पंढरपूर वारीत सहभागी झाले आहेत.

# कॅलिडोस्कोप



## पतीने लावले पत्नीचे लग्न!

सोनम रघुवंशी आणि मेरठमधील सौरभ-मुस्कान सारख्या घटनांनी समाज हादरलेला आहे. मुली इतक्या क्रूर कशा होऊ शकतात, असा प्रश्न समाजाला पडला आहे. पण ही कथा या सर्व घटनाक्रमांत वेगळी ठरली आहे. उत्तर प्रदेशातील अमेठी येथे हे प्रकरण घडले आहे.

लग्नाच्या १३ वर्षानंतर या महिलेच्या जीवनात तिचा प्रियकर आला. दोघांमध्ये चोरून चोरून भेटी सुरू झाल्या. त्याची कुणकुण पतीला लागली. अमेठीजवळील गावातील सतई या तरुणाचे कुटमारा गावातील सीमासोबत लग्न झाले होते. लग्नाला १३ वर्षे पूर्ण झाली होती. दोघांमध्ये सर्व काही व्यवस्थित होते. पण त्यांना मुलबाळ नव्हते. या एकाच गोष्टीचे दोघांना दुख होते. त्यातच सीमा हिला तिचा प्रियकर शिवानंद अमेठीमध्ये दिसला. पुढे संपर्क वाढला. पत्नी आता पूर्वीसारखी वागत नसल्याचे सतईच्या लक्षात आले. त्याने तिला विचारले, त्यावर ती काही बोलली नाही. पण एकदिवस सतईने त्या दोघांना पकडले. दोघांना घेऊन तो थेट पोलिस ठाण्यात हजर झाला.

पोलिस ठाण्यात आल्यावर सतईने बायकोचे तिच्या प्रियकरासोबत लग्न लावण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे शिवानंद, सीमा आणि पोलिसांना पण धक्का बसला. त्यांनी न्यायालयात ही प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले. सतई सीमाला घेऊन घरी गेला. तिच्या घरच्यांना बोलावून घेतले. त्याच्या आई-वडिलांना हा प्रकार सांगितला. सीमाचे शिवानंदसोबत लग्न लावण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. त्यानंतर त्याने सीमाला तिच्या माहेरी सोडले. पुढे दोघांच्या नोंदणी विवाहाची प्रक्रियासुद्धा त्यानेच करून दिली. शिवानंदने सतईचे आभार मानले. सीमाला आनंदात ठेवणार असल्याचे त्याने सांगितले.

सतईने पत्नी सीमाला शिवानंदसोबत लग्न करणार का, असा पहिला प्रश्न केला होता. तिने तात्काळ होकार दिल्याने सतईने मग न्यायालयीन प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी अर्ज केला. त्यानंतर त्यांच्या नोंदणी विवाहाची तयारी पण करून दिली. दोघांचे लग्न झाले. सतईच्या मते पत्नी प्रियकरसोबत राहू इच्छित होती. त्यामुळे तो या प्रेमाच्या आड येऊ इच्छित नव्हता. गावकऱ्यांनी सतईच्या भूमिकेचे कौतुक केले आहे.



## आधुनिक शाहजहान!

सध्या एक घर खूपच चर्चेत आहे. या घराची रचना अगदी ताजमहालसारखी आहे. दूरवरून पाहिल्यास इथेही ताजमहाल बांधला गेला आहे, असे वाटते. पण ही ऐतिहासिक इमारत किंवा हॉटेल नाही, तर एका जोडप्याचे खासगी घर आहे. हे अनोखे घर मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर जिल्ह्यात आहे.

हे आलिशान चार बीएचके घर तेथील व्यापारी आनंद प्रकाश चौकसे यांनी खास त्यांच्या पत्नीसाठी प्रेमाचे उदाहरण म्हणून बांधले आहे. मुगल सम्राट शाहजहान यांनी त्यांच्या बेगम मुमताजसाठी ताजमहाल बांधला होता तसेच यांनी हे घर बांधले आहे. या घराच्या बांधकामात डिझाइनकडे विशेष लक्ष दिले गेले आहेच पण प्रत्येक लहान-मोठ्या तपशीलात ताजमहालची झलक स्पष्टपणे दिसते. चमकदार पांढऱ्या रंगाची ही इमारत दुरूनच लोकांचे लक्ष वेधून घेते. तिचे उंच मिनार, घुमट आणि सुंदर कोरीव काम ताजमहालची आठवण करून देते.

आनंद प्रकाश चौकसे म्हणतात, ते सुरुवातीपासूनच ताजमहालच्या सौंदर्याचे वेडे होते आणि त्यांच्या पत्नीसाठी नेहमीच काहीतरी खास करायचे होते. या इच्छेने त्यांना हे भव्य घर बांधण्याची प्रेरणा मिळाली. आता त्यांचे हे घर त्यांच्या कुटुंबासाठी राहण्यासाठी एक सुंदर ठिकाण नाही, तर बुऱ्हाणपूर शहरासाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. चौकसे शहरात एक निवासी शाळा चालवतात. त्यात सुमारे २२०० मुले शिक्षण घेतात. ते म्हणतात, हे त्यांचे कुटुंब आहे.

## रिक्षा चालकाची अजब कमाई!

मुंबईच्या गर्दीत आणि वाहतुकीत दररोज हजारो ऑटोरिक्षावाले प्रवाशांच्या शोधात इकडे तिकडे धावतात. पण या ऑटोवाल्यांपैकी एकाने कमाईच्या बाबतीत इतरांना मागे टाकले. तो तास न तास ऑटो न चालवता, घाम न गाळता महिन्याला लाखो रुपये कमवू लागला. 'सोशल मीडिया'वर त्याच्या कमाईचे रहस्य उघड झाल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले. सध्या त्याचे दुकान बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.



ही कहाणी मुंबईतील अमेरिकन दूतावासाच्या बाहेर सुरू झाली. दररोज मोठ्या संख्येने लोक व्हिसा मुलाखतीसाठी येथे येतात. पण दूतावासाचे नियम खूप कडक आहेत. आत जाताना कोणीही बॅग, मोबाईल किंवा पर्स घेऊन जाऊ शकत नाही. या हुशार ऑटोवाल्याने पैसे कमवण्यासाठी या संधीचा उपयोग करून घेतला. गेल्या आठवड्यात 'व्हेन्यू मंक'चे सह-संस्थापक राहुल रुपानी यांनाही व्हिसासाठी येथे यावे लागले. त्यांना त्यांची बॅग दूतावासात नेण्यापासून रोखण्यात आले तेव्हा त्यांना त्यांच्या सामानाचे काय करायचे याची चिंता वाटली. अचानक जवळच उभ्या असलेल्या एका ऑटो चालकाने त्यांना बॅग स्टोरेज इथे असून त्यासाठी फक्त एक हजार रुपये लागतील, असे सांगितले. राहुलला प्रथम तो कदाचित मस्करी करत असेल, असे वाटले. पण नंतर खरा प्लॅन उघडकीस आला. प्रत्येक बॅगसाठी एक हजार रुपये निश्चित करण्यात आले होते. तो रिक्षावाला दररोज अशा शेकडो लोकांच्या बॅगा सांभाळतो आणि प्रत्येक बॅगसाठी एक हजार रुपये घेता, असे राहूलला कळले. म्हणजे तो ऑटो न चालवता महिन्याला ५ ते ८ लाख रुपये कमवत होता.

दूतावासाबाहेर स्टोरेजसाठी कोणतीही अधिकृत व्यवस्था नव्हती म्हणून या रिक्षा चालकाने पोलिसांशी संगनमत करून हा व्यवसाय सुरू केला. लोक फक्त येऊन त्यांच्या बॅगा जमा करायचे आणि मुलाखतीसाठी दूतावासात जायचे. राहुलने त्याच्या लिंक्डइनवर अकाऊंटवर हा संपूर्ण प्रकार उघडकीस आणला तेव्हा 'सोशल मीडिया'वर एकच खळबळ उडाली. बिझनेस टायकून हर्ष गोयंका यांनीही त्यांची पोस्ट लाईक केली आणि या चालकाच्या जुगाडाला सलाम केला. तथापि, एका सामान्य माणसाला अशा प्रकारे मोठी रक्कम कशी द्यावी लागत आहे, यावरही लोक संतापले. पोस्ट व्हायरल होताच पोलिसांनी कारवाई केली. आता हा व्यवसाय बंद करण्यात आला आहे. रिक्षा चालकाची चौकशी केली जात आहे आणि कोणत्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गेम सुरू होता याचाही तपास केला जात आहे.




## विचित्र नावांची गावे

काही गावांची विचित्र नावे ऐकून लोक सुरुवातीला हसतात. मग प्रश्न पडतो की हे नाव काय आहे? आणि ते कोणी दिले? उत्तर प्रदेशातील एका गावाचे नाव 'सुअर' आहे. कर्नाटकातील एका गावाचे नाव 'कुट्टा'. ही नावे ऐकल्यानंतर, एखाद्या व्यक्तीचा स्वतःच्याच कानावर विश्वास बसणार नाही; परंतु वस्तुस्थिती तशीच आहे.

रायपूरमधील एका गावाचे नाव 'लडकी' आहे, तर गंगापूर परिसरात 'रंगोली' आणि 'मेहंदी' गावेदेखील आहेत. करेरा परिसरात 'रेल' हेदेखील एका गावाचे नाव आहे. बिजोलियामध्ये सुंठी, बांका, भुंटी, फूलन अशी गावे आहेत. येथे सरकी कुंडी, नीमडी गावा, पापडबार अशी काहीही नावे आहेत. झरोली सर्कलमध्ये 'भोपी की राते' नावाचे एक गाव आहे. गावकऱ्यांच्या विनंतीवरून अनेक गावांची नावे बदलली जात असली तरी काही इतर गावांची नावे अजूनही तीच आहेत.

काहींची नावे अन्नपदार्थांवर आधारित आहेत. कोटडी परिसरातील एका गावाचे नाव 'प्याज' आहे. काही गावांची नावे लोकांच्या नावांवर आधारित आहेत. 'दयाराम जी का गुढा', 'रामसिंहजी खेडा' अशी ही नावे आहेत.

मंडल परिसरात 'भिलडी' नावाचे एक गाव होते. गावाचे नाव सांगायला लोकांना लाज वाटायची. त्यानंतर या गावाचे नाव रामनगर ठेवण्यात आले. मंडलगड परिसरात 'उंदरोन का खेडा' नावाचे एक गाव आहे. स्थानिक भाषेत उंदराला उंद्रा म्हणतात. त्याचप्रमाणे मीठा, सांड, 'मोचडियों का खेडा', गोठ, गोथरा हीदेखील ही गावांची नावे आहेत. जहाजपूर परिसरात एकलमाडी, उलेला, 'खाना का खोहला' ही गावे आहेत.. मंडलगड परिसरात, बदनपुरा, कोतवाल का खेडा अशी नावे आहेत. जहाजपूरमध्ये बिहाराला जीरा, गलिया, रोजडी अशी नावे आहेत. आसिंदमध्ये जाली, रायपूरच्या झाडोलमध्ये डांगरा-दांगडी अशी नावे ऐकू येतील. बिजोलियामध्ये शिकारगाह, तिखी, काकी, आती इत्यादी नावे आहेत. ती कोणालाही विचित्र वाटतील.







## भन्नाट चवींचे पदार्थ

मोदक, पाणीपुरी, मसाला मिल्क, मिरची, आलं-लिंबू हे आईस्क्रीमचे भन्नाट फ्लेवर्स खवय्यांना भुलवतात. पदार्थांमध्ये वेगवेगळी कॉम्बिनेशन्स केली जातात. चॉकलेट सँडविच, चॉकलेट डोसा, पावभाजी डोसा, पालक पनीर डोसा हे पदार्थ आज लोकप्रिय झाले आहेत. मात्र कोणाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नसतो. आपण विचारही करू शकणार नाही, असे पदार्थ सध्या इंटरनेटवर लोकप्रिय ठरले आहेत. या पदार्थांचे फोटो बरेच व्हायरल होत आहेत. काहींना ही कल्पना भावली आहे तर काहींनी नाकं मुरडली आहेत. कुरकुरे मिल्कशेकची रेसिपी बरीच व्हायरल झाली आहे. कुरकुरे हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. मात्र कुरकुरे मिल्कशेक ही संकल्पना पचणं तसं कठीणच. गुलाबजाम पिझ्झाचा फोटोही व्हायरल झाला आहे. यात पिझ्झावर गुलाबजाम ठेवल्याचं पहायला मिळतं. मात्र अशा प्रकारच्या पिझ्झाचा विचारही आपण करू शकत नाही. अर्थात कोणाला कोणती चव आवडेल, हे सांगता येणार नाही. मात्र असले भन्नाट पदार्थ भविष्यात लोकप्रिय झाले तर आश्चर्य वाटायला नको.



## आयव्हीएफ तंत्राने जन्मला बेडूक!

आयव्हीएफ तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भधारणा केली जाते. अपत्यहीन जोडप्यांसाठी आयव्हीएफ तंत्रज्ञान हे एक वरदान ठरलं आहे. मात्र याच तंत्रज्ञानाचा वापर करून बेडकांची नष्ट होणारी प्रजाती जतन करण्याचं काम होत आहे. ओलफ प्रजातीच्या एका बेडकाचा जन्म आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे झाला आहे. ओलफ प्रजाती दुर्मीळ होत चालली आहे. १९८७ पासून या प्रजातीच्या बेडकांची संख्या खूप कमी झाली आहे. या प्रजातीच्या बेडकांचं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेतल्या टेक्सासमधलं फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या प्रक्रियेसाठी सहा नर बेडकांचे शूक्राणू गोठवून ठेवण्यात आले होते. या शूक्राणूंचं दोन मादी बेडकांच्या बीजांडांशी फलन घडवून आणण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आणि या बेडकाचा जन्म झाला. आयव्हीएफ तंत्रज्ञानाने जन्मलेल्या या बेडकाचं वजन अवघं सहा ग्रॅम आहे. फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठ गेल्या अनेक वर्षांपासून हार्मोन थेरेपी आणि प्रजननाच्या कृत्रिम पद्धती विकसित करण्यावर काम करत आहेत. यामुळे भविष्यात विविध प्रजातींचं संरक्षण शक्य होणार आहे.

## लग्नात उभा केला दुसराच वर!

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये नियोजित वराच्या जागी दुसऱ्यालाच उभे केल्याचा प्रकार समोर आला. पण इथे वधूला शेवटच्या क्षणी सत्य कळले आणि तिने लग्न रद्द केले. त्यामुळे बराच गोंधळ उडाला. पोलिसांनाही बोलावण्यात आले. त्यानंतर वराला रिकाम्या हाताने परतावे लागले.


वधूपक्षाने वराच्या कुटुंबावर फसवणूक केल्याचा आरोप केला. ते म्हणाले, आम्हाला दुसऱ्याचा फोटो दाखवण्यात आला होता आणि वेगळाच वर सेहरा घालून आला. लग्नासाठी आलेला वर वधूच्या वडिलांच्या वयाचा होता. अशा परिस्थितीत वधूने लग्न करण्यास नकार दिला. मात्र वधूच्या बाजूने या प्रकरणात पोलिसांकडे कोणतीही तक्रार दिली नाही. उलट त्यांना जेवण देऊन परत पाठवण्यात आले. इंदूरहून फुलपूर कोतवाली परिसरातील एका गावात लग्नाची मिरवणूक आली होती. वधूच्या बाजूच्या लोकांनी लग्नाच्या मिरवणुकीत आलेल्या लोकांना अल्पोपहार आणि पाहुणचार दिल्यानंतर संध्याकाळी मिरवणूक दाराशी पोहोचताच द्वारचार विधी सुरू झाला.



लग्नासाठी सजलेल्या वधूने वराला पाहताच तिने त्याच्याशी लग्न करण्यास नकार दिला आणि म्हटले, वर तिच्या वडिलांच्या वयाचा आहे. ती इतक्या वयस्कर वराशी लग्न करणार नाही. यामुळे गोंधळ उडाला. वधूच्या बाजूच्या लोकांनी वर बदलल्याचा आरोप करत लग्नाच्या मिरवणुकीत गोंधळ घातला. पंचायत तासन्तास चालली. परंतु कोणताही उपाय सापडला नाही.

माहिती मिळताच, फुलपूर पोलिस घटनास्थळी पोहोचले. काहींच्या समजूतदारपणामुळे प्रकरण कसेबसे मिटले. वराचा स्वभाव पाहून बहुतेक लोक रात्रीच इंदूरला निघून गेले. माणुसकी दाखवत तिथे राहिलेल्या वऱ्हाडी मंडळींसाठी जेवणाची व्यवस्था केली आणि त्यांना सकाळी घरी जाऊ दिले. इंदूरहून आलेला वर वधूशिवाय रिकाम्या हाताने परतला.





## स्मार्टफोनची सवय सोडवण्यासाठी...

आजकाल लहानग्यांच्या हाती फक्त स्मार्टफोन दिसतो. स्मार्टफोनमुळे मुलं बाहेर खेळायलाही जात नाहीत किंवा छंद जोपासत नाहीत. लहानग्यांची ही सवय सुटावी यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. विविध युक्त्या लढवल्या जातात. स्मार्टफोन बाजूला ठेऊन मुलांनी दुसऱ्या कामांमध्ये लक्ष घालावं यासाठी भारतासह इतर देशांमध्येही प्रयत्न होताना दिसतात. इंडोनेशियातल्या पश्चिम जावा परिसरातल्या बांडुंग शहरात मुलांना स्मार्टफोन आणि टिव्हीपासून लांब ठेवण्यासाठी अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे. इथल्या मुलांना कोंबडीची पिल्लं, रोपटी तसंच बिया दिल्या जात आहेत. मुलांनी स्मार्टफोन बाजूला ठेऊन कोंबडीच्या पिलांची आणि या रोपट्यांची देखभाल करावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. प्रशासनाने इथल्या बारा शाळांमध्ये कोंबडीची दोन हजार पिल्लं आणि १५०० रोपटी तसंच बियांचं वाटप केलं आहे. इंडोनेशियामध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या देशातली मुलंही इंटरनेट, स्मार्टफोनच्या आहारी गेली आहेत. यामुळे या देशातलं प्रशासन चिंतेत आहे. मुलांना आणि त्याच्या पालकांना ही संकल्पना भावली. स्मार्टफोनवर वेळ घालवण्यापेक्षा कोंबडीच्या पिल्लांची तसंच रोपट्यांची देखभाल करणं कधीही चांगलं, असं त्यांचं म्हणणं आहे. मुलांना स्मार्टफोनपासून लांब ठेवण्यासाठी राबवण्यात येणारा हा उपक्रम अनोखा म्हटला पाहिजे.

## ऊस उत्पादन वाढीसाठी एआय तंत्रज्ञान ठरेल फायद्याचे : नितीन गडकरी

# ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे विशेष कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

जगातील सर्वोत्तम अद्ययावत ज्ञान आणि आपल्या जवळच्या माणसांनी केलेले यशस्वी प्रयोग समजून घेत शेतकऱ्यांना पुढे जावे लागणार आहे. शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर ऊस, सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी फायद्याचा ठरू शकतो, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (रविवार, दि. ६ जुलै) व्यक्त केला.

ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. एनबीबीएस सभागृह, (राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग संस्थान) अमरावती रोड येथे झालेल्या या




कार्यशाळेला नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर बारामती कृषी विज्ञान केंद्रातील संशोधक डॉ. विवेक भोईटे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेला ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर, मार्गदर्शक डॉ. सी. डी. मायी, आनंदराव राऊत, रमेश मानकर, सुधीर दिवे, डॉ. समय बनसोड, भोजराम कापगते, अनिल जोशी, जयकुमार वर्मा, एनबीबीएसचे संचालक डॉ. नितीन पाटील, डॉ. कलंत्री आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

नितीन गडकरी म्हणाले, शेतकऱ्याचे उत्पादन थेट बाजारात जाणे. त्याच्या मालाला चांगला भाव मिळणे खूप आवश्यक आहे. त्यादृष्टीने काम सुरू आहे. शेतकऱ्यांना गोडाऊन, कोल्ड स्टोरेज उपलब्ध करून देण्याची गरज आहे. विदर्भात विशेषतः सोयाबीन, कापूस, संत्रा, ऊस या पिकांवर फोकस ठेवावा लागेल. योग्य तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि संशोधन मिळाले तर विदर्भातील शेतकरी नक्कीच प्रगती करू शकेल. त्यासाठी नवे तंत्रज्ञान आणि संशोधन शेतकऱ्यांना समजून घ्यावे लागेल. एकमेकांच्या समन्वयातूनच हे शक्य आहे. त्यासाठी नॉलेज ट्रान्सफॉर्मेशन चेन निर्माण करावी लागेल, असेही नितीन गडकरी म्हणाले. यावेळी नितीन. गडकरी यांनी बांबु लागवडीचे महत्त्व देखील सांगितले. सूत्रसंचालन नितीन कुलकर्णी यांनी केले.

नितीन गडकरी यांनी सभागृहात शेतकऱ्यांच्या मध्ये बसूनच एआयच्या वापराच्या संदर्भातील प्रेझेंटेशन बघितले. तज्ज्ञांनी केलेले मार्गदर्शन ऐकले. त्यानंतर त्यांनी बराचवेळ खाली बसूनच शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. सत्कार स्वीकारण्यासाठी व्यासपीठावर गेले असता काही मुद्यांवर विचार मांडले.

### विदर्भातील शेतकऱ्यांना होईल फायदा

शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग आणि फायदे यांची सखोल माहिती बारामती कृषी विज्ञान केंद्रातील संशोधक डॉ. विवेक भोईटे यांनी आज दिली. उत्पादकता व उत्पन्न वाढीसाठी हे आय-आय तंत्रज्ञानाचा वापर विदर्भातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरू शकतो असे डॉ. भोईटे यावेळी म्हणाले. ॲग्रोव्हिजनच्या माध्यमातून लवकरच विदर्भातील प्रगतिशील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ बारामती कृषी विज्ञान केंद्राला भेट देणार असून तेथील तंत्रज्ञान अवगत करून घेणार आहे.

# अनैतिक संबंधातून पतीचा खून

### प्रियकरासह पत्नीला अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ६ :

अनैतिक संबंधातून पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा गळा दाबून खून केल्याची घटना वाठोडा पो. स्टे. अंतर्गत तरोडी (खु.) येथील साईनाथ सोसायटीत उघडकीस आली.

चंद्रसेन बाळकृष्ण रामटेके (३८) असे मृतक पतीचे नाव असून दिशा चंद्रसेन रामटेके (३०) आणि राजा इस्लाम अंसारी उर्फ राजाबाबू टायरवाला (२८) राजनगर, वाठोडा अशी आरोपींची नावे आहेत.

चंद्रसेनला दोन मुली आणि एक मुलगा आहे. पूर्वी तो एका ट्रॅव्हल्स कंपनीत व्यवस्थापक म्हणून कामाला होता. दीड वर्षांपूर्वी त्याला अर्धांगवायूचा झटका आला. त्यामुळे तो घरीच रहात असे. चंद्रसेनला अर्धांगवायूचा झटका आल्यानंतर उदरनिर्वाह कसा करायचा असा प्रश्न निर्माण झाला. त्यातच दिशा ही कार चालवायला शिकली. त्यातून ती प्रवाशांना ने आण करीत असे. परंतु, कधी कधी बाहेरगावी जावे लागत असल्याने तीने कार चालविणे सोडून दिले. त्यानंतर स्वतःचे दागीने तोडून तीने घरीच पाण्याचा धंदा सुरू केला. विविध कार्यक्रमात ती पाण्याच्या कॅनचा पुरवठा करीत असे. दरम्यान, दिशाच्या घराजवळच आरोपी राजा याचे टायरचे दुकान होते. येता जाता त्यांची नजरानजर होत होती. त्यातच त्यांचे सूत जुळले. ही माहिती चंद्रसेनला समजताच तो संतापला. त्यानंतर तो तिला वारंवार शिवीगाळ करीत असे. रोजच्या शिवीगाळीला दिशा कंटाळली होती. ही माहिती दिशाने राजाला दिली होती. त्यानंतर दोघांनीही चंद्रसेनचा काटा काढण्याचे ठरविले.

४ जुलै रोजी दुपारी तीनच्या सुमारास चंद्रसेन आपल्या घरी झोपला होता. त्यावेळी दिशाने फोन करून राजाला आपल्या घरी बोलावून घेतले. राजाने झोपेत असलेल्या चंद्रसेनच्या तोंडावर उशीने दाबून त्याचा खून केला. त्यानंतर तो आपल्या दुकानात निजून गेला. तीन तासानंतर दिशाने कांगावा करायला सुरुवात केली. त्यामुळे वस्तीतील लोक गोळा झाले. दिशाने त्याला चारचाकी वाहनातून मेडिकलमध्ये नेले. डॉक्टरांनी चंद्रसेनला तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. चंद्रसेनच्या शेजारी राहणारा श्याम आत्राम यांनी ही माहिती चंद्रसेनचा मोठा भाऊ संजय रामटेके यास दिली.

दुसऱ्या दिवशी शवविच्छेदन अहवाल आला असता कुठल्यातरी वस्तूने चंद्रसेनच्या तोंडावर आणि नाकावर दाब दिल्याने त्याचा मृत्यू झाला असे डॉक्टरांनी सांगितले. सहायक निरीक्षक संतोष सपाटे यांनी दिशाची विचारपूस केली असता ती फुटली आणि प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केल्याची कबुली दिली.

याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून दोघांनाही अटक केली. पोलिसांनी त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. सहायक निरीक्षक सपाटे पुढील तपास करीत आहेत.

# तरुण शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
हिंगोली, दि. ६ :

आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत दाती येथे तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी ता. ६ सकाळी आठ वाजता उघडकीस आली आहे. घरातील एकुलता एक मुलगा गेल्याने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कर्जामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे.

याबाबत सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दाती येथील गणराज डिगांबर कदम (२५) हा त्याच्या आई सोबत राहात होता. सहा महिन्यापुर्वीच त्याच्या वडिलांचे निधन झाल्याने दोघेच घरी होते. घरी साडेतीन एकर शेती असून या शेतीवर सुमारे ७५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र मागील दोन ते तीन वर्षापासून सततची नापिकी यामुळे कर्ज कसे फेडावे याची चिंता गणराज याला लागली होता. त्यातच वडिलांचे निधन झाल्यामुळे सर्वभार त्याच्यावर आला होता. दरम्यान, त्याची आई आखाडा बाळापूर येथे भावाकडे गेली होती. त्यामुळे गणराज एकटाच घरी होता. आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास तो घराबाहेर आला नसल्याने शेजारच्यांनी घराच्या पाठीमागील दरवाजातून पाहणी केली असता गणराज याचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला.

# नागपुरातील डॉप्लर वेदर रडार बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

प्रादेशिक हवामान केंद्रातील "डॉप्लर वेदर रडार' ऐन पावसाळ्यात बंद, आधीच घेता येतो आपत्कालीन स्थितीचा अचूक अंदाजप्रतिनिधी `नागपूरवादळ आणि गारपिटीचा अंदाज "डॉप्लर वेदर रडार' या यंत्रणेच्या माध्यमातून दिला जातो. मात्र नागपूर प्रादेशिक हवामान केंद्र परिसरातील "डॉप्लर वेदर रडार' यंत्रणा सध्या बंद असल्याने वादळ, गारपीट आणि नैसर्गिक संकटांचा आगाऊ अंदाज मिळणे बंद झाले आहे.

या संदर्भात केंद्राधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता एक दोन दिवसात सुरू होणार असल्याची माहिती दिली.नागपूर शहरात हवामानाचा अंदाज वर्तवण्यासाठी डॉप्लर वेदर रडार वापरले जात. काही



दिवसांपूर्वी बंद झालेले रडार अजूनही दुरुस्त झालेले नाही. दुरूस्तीसाठी मुंबईहून तंत्रज्ञ बोलावण्यात आले आहे. ते आले की दुरूस्ती सुरू होईल, असे प्रादेशिक हवामान केंद्राधिकाऱ्याने सांगितले. नागपूरमधील रडार बंद असले तरी, हवामान विभागाकडून इतर माध्यमातून नागरिकांना हवामानाचा अंदाज दिला जाईल, असे केंद्राने सांगितले आहे.

हवामानाचे, पावसाचे, अतिवृष्टीचे, गारपिटीचे अचूक अंदाज वर्तविण्यासाठी डॉप्लर रडार ही यंत्रणा उपयुक्त असते. या यंत्रणेच्या साहाय्याने आपत्कालीन स्थितीचा अचूक अंदाज आधीच घेता येतो. त्यामुळे नुकसानाची तीव्रता कमीत कमी करण्यासाठी आधीच प्रयत्न करता येतात. असे काम करते डॉप्लर रडारडॉप्लर रडार ही पावसाची खात्रीशीर माहिती देणारी आपत्कालीन यंत्रणा आहे.

अचूक हवामान माहिती देण्यासाठी तिचा वापर जगभर सर्रासपणे केला जातो. डॉप्लर रडार विद्युत चुंबकीय लहरी ढगावर सोडते. ढगांकडून परतणाऱ्या लहरी ढगाची "एक्स रे'प्रमाणे इत्थंभूत माहिती आणतात. डॉप्लर रडार ढग सरकत असतानाही अचूक माहिती देते. डॉप्लर रडारच्या साहाय्याने पावसाची, ढगफुटीची, गारपिटीची माहिती सहा ते चार तास आधी मिळू शकते.

# मुख्यमंत्र्यांना अणाजी पंत म्हणणे हा अपमान

## देवेंद्र फडणवीसांवर केलेल्या टीकेला दीपक केसरकरांचे प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ६ :

हिंदी सक्तीच्या विरोधात आणि मराठी भाषेच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले. मुंबईत पार पडलेल्या विजयी रॅलीमध्ये उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. भाषणात त्यांनी फडणवीसांचा



उल्लेख 'अणाजी पंत' असा करत टोला लगावला. यावर शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा अशा प्रकारे उल्लेख करणे म्हणजे मुख्यमंत्रिपदाचा अपमान असल्याचे केसरकर यांनी म्हटले. राज्याच्या प्रमुखाला अण्णाजी पंत म्हणणं हे त्या पदाचा अपमान आहे. मुख्यमंत्र्यांची तुलना ही पेशव्यांशीही करता आली असती. राजकारणात वैचारिक मतभेद असावेत. पण ते व्यक्तिगत पातळीवर येऊ नयेत, असे स्पष्ट मत दीपक केसरकर यांनी व्यक्त केले आहे. पुढे ते म्हणाले, दोन भाऊ एकत्र आले ही चांगली गोष्ट आहे. वापरा आणि फेकून द्या ही उद्धव ठाकरेंची नीती मी स्वतः अनुभवली आहे. राणेंच्या विरोधात माझा वापर करून घेतला.



## Too Yumm! के-बॉम्बची ब्रँड ॲम्बेसेडर अनन्या पांडे

इन्स्टंट नूडल्सच्या श्रेणीत के-बॉम्बद्वारे यशस्वी पदार्पण केल्यानंतर, Too Yumm! ब्रँडने आता प्रीमियम नूडल्स विभागातील आपली उपस्थिती अधिक बळकट करण्यासाठी लोकप्रिय युवा अभिनेत्री अनन्या पांडे हिला ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले आहे.

या नव्या भागीदारीबाबत बोलताना Too Yumm!चे चीफ मार्केटिंग ऑफिसर योगेश तिवारी म्हणाले, "अनन्याचे उत्साही व्यक्तिमत्व आणि तरुणाई Too Yumm! आणि के-बॉम्बच्या मजेदार, चवदार ओळखीशी पूर्णपणे सुसंगत आहे. तिचा प्रभाव आणि जनमानसाशी असलेली सुसंगती ब्रँडचा अपील आधुनिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

हॉट एन स्पायसी आणि टॉम यम या लोकप्रिय फ्लेवर्सच्या यशानंतर, के-बॉम्ब रेंजमध्ये आता किमची, कोरियन चिकन आणि सिचुआन पेपर कॉर्न हे तीन आकर्षक नवीन फ्लेवर्स सादर करण्यात आले आहेत. यासोबतच, प्रवासी ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन कंपनीने नाविन्यपूर्ण ऑन-द-गो (ओटीजी) कप नूडल्स पॅक देखील बाजारात आणला आहे. दरम्यान, ब्रँडने लाँच केलेली क्यूआर-कोड-आधारित डिजिटल मोहीम ग्राहकांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरली असून, ही मोहीम उत्पादन अनुभवाला आणखी समृद्ध करते. ■ ■



लोकार्थ

## ट्रॅव्हल फूड सर्व्हिसेसचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव आज उघडणार

ट्रॅव्हल फूड सर्व्हिसेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १ रु. दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १,०४५ रु. ते १,१०० रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) सोमवार, ७ जुलै २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि बुधवार, ९ जुलै २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १३ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १३ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

हा आयपीओ पूर्णपणे कपूर फॅमिली ट्रस्टने २,००० कोटी रुपयांपर्यंतच्या इक्विटी शेअर्सपर्यंत विक्रीसाठी ऑफर आहे. कर्मचारी आरक्षण विभागात बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअर १०४ रु. ची सूट दिली जात आहे. ट्रॅव्हल फूड सर्व्हिसेस लिमिटेड ही वेगाने वाढणाऱ्या भारतीय विमानतळ प्रवास जलद सेवा रेस्टॉरंट (ट्रॅव्हल क्यूएसआर) आणि लाउंज क्षेत्रात कार्यरत आहे.

ते भारत, मलेशिया आणि हाँगकाँगमधील विमानतळांवर ट्रॅव्हल क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट (ट्रॅव्हल क्यूएसआर) आणि लाउंज (लाउंज) व्यवसाय चालवते. ■ ■




## कल्याणी बंधूंना कौटुंबिक संपत्ती हडपण्यापासून थांबविण्याची बहिणीची मागणी

सुगंधा हिरेमठ (पूर्वाश्रमीच्या कल्याणी) यांना अलीकडे काही नवीन पुरावे मिळाले आहेत, ज्यावरून त्यांचे भाऊ कौटुंबिक संपत्ती गुपचूप हस्तांतरित करत असल्याचे स्पष्ट होते. त्यांनी नुकतेच, २७ जून रोजी पुणे न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात, लहान भाऊ गौरीशंकर कल्याणी यांनी कराडमधील कौटुंबिक मालमत्ता बेकायदेशीररीत्या हस्तगत केल्याचे दोन प्रकार सविस्तर मांडले आहेत. सुगंधा यांनी सांगितले की, त्यांच्या लहान भावाने वडील डॉ. नीलकंठ कल्याणी यांच्याशी असलेल्या चांगल्या संबंधांचा गैरफायदा घेत, कराडमधील मालमत्ता व्यवस्थापित करण्यासाठी वडिलांकडून पॉवर ऑफ अटर्नी मिळवली.

ही केवळ मालमत्ता व्यवस्थापनासाठी होती, पण प्रत्यक्षात ही कागदपत्रे तयार करताना त्यात हस्तांतरण व देणगी देण्याचा अधिकारही समाविष्ट करण्यात आला. विशेष म्हणजे, त्या कागदपत्रांमध्ये गौरीशंकर यांच्या कंपनीतील एका कर्मचाऱ्याचे नावही समाविष्ट करण्यात आले होते. हा प्रकार २००८ मध्ये घडला. या कागदपत्रांचा वापर करून, दोन मोठ्या मालमत्ता गौरीशंकरच्या नावावर करण्यात आल्या. सुगंधा यांच्या प्रतिज्ञापत्रात नमूद आहे की, डॉ. नीलकंठ कल्याणी यांना हा "फसवणुकीचा प्रकार" २००९ मध्ये लक्षात येताच त्यांनी ती POA रद्द केली व न्यायालयात दाद मागितली. त्या दोन मालमत्ता बेकायदेशीर व फसवणूकपूर्वक फक्त गौरीशंकरच्या नावावर करण्यात आल्या होत्या, असा आरोप त्यांनी केला आहे. ■ ■

## ऑनलाइन फसवणुकीविरोधात एअरटेलची कडक कारवाई

भारतातील आघाडीची टेलिकॉम कंपनी भारती एअरटेल ("एअरटेल") ने मुंबईतील वाढत्या ऑनलाइन फसवणुकीविरोधात आपल्या मोहिमेत उल्लेखनीय प्रगतीची घोषणा केली आहे. देशभरात एआय वर आधारित फ्रॉड डिटेक्शन सिस्टीम लाँच अंतर्गत एअरटेलने मुंबईत अवघ्या 50 दिवसांत 21 लाखांहून अधिक युजर्सना सफलतेने ऑनलाइन फसवणुकीपासून वाचविले आहे.

ही अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली सर्व एअरटेल मोबाइल आणि ब्रॉडबँड ग्राहकांसाठी ऑटोमॅटिक पद्धतीने ॲक्टिव्हेट होते. ती एसएमएस, व्हॉट्सॲप, टेलिग्राम, फेसबुक, इंस्टाग्राम, ईमेल आणि इतर ब्राउझर्सवर पाठविलेली लिंक स्कॅन आणि फिल्टर करते. हे तंत्रज्ञान रिअल-टाइम थ्रेट इंटेलिजन्सचा वापर करते. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



# शोषण करायचं हे सरकारी षडयंत्र : बच्चू कडू

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ६ :

देशात आणि राज्यात राजकीय, धार्मिक आणि जातीय ध्रुवीकरणाच्या सावलीत शेतकरी-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांची हत्या होत असल्याचा घणाघात प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केला आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हिंदू म्हणून एकत्र येऊ शकतात, मराठा-ओबीसी एक होऊ शकतात, तर शेतकरी-शेतमजूर एकत्र का येऊ नयेत, असा थेट सवाल बच्चू कडू यांनी केला. ते आज रविवारी स्थानिक विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

उद्या सोमवार, ७ जुलैपासून १३८ किलोमीटरची सातबारा कोरा करा, ही पदयात्रा काढण्यात येत आहे. या यात्रेच्या तयारीसाठी कडू आज यवतमाळ येथे आले होते. भारताचे



पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ (जि. अमरावती) येथून सुरू होणाऱ्या या यात्रेचा समारोप महाराष्ट्रातील पहिली शेतकरी सामूहिक आत्महत्या म्हणून नोंद असलेल्या साहेबराव करपे यांचे जन्मगाव चिलगव्हाण (जि. यवतमाळ) येथे १४ जुलै रोजी होणार आहे. या यात्रेत कोणताही पक्षीय झेंडा नाही, असे कडू यांनी यावेळी स्पष्ट केले. ही यात्रा सरकारला दोष देण्यासाठी नाही, तर शेतकऱ्यांना जागवण्यासाठी आहे, असे कडूंनी स्पष्ट केले. मार्गात शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या देशात धर्म आणि जात दाखवून सामान्य कष्टकरी माणसाला वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. शेती विकायची, शोषण करायचं आणि कंपनीराज आणायचं हे सरकारी षड्यंत्र असल्याची टीका त्यांनी केली.

# कारच्या धडकेत ज्येष्ठाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ६ :

मुंबई-पुणे रस्त्यावरील पाटील इस्टेट भागात भरधाव मोटारीच्या धडकेत पादचारी ज्येष्ठाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अपघातानंतर पसार झालेल्या कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठाचे वय अंदाजे ६५ वर्ष असून, त्यांची अद्याप ओळख पटलेली नाही. मुंबई-पुणे रस्त्यावरील पाटील इस्टेट पूल परिसरातून ज्येष्ठ नागरिक पायी जात होता. त्यावेळी भरधाव कारने ज्येष्ठ नागरिकला धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पसार झालेल्या कारचालकाविरुद्ध खडकी पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला.

# देसाईगंज येथील मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ स्वीकृत करणाऱ्या गुणनियंत्रण अधिकाऱ्यास तत्काळ निलंबित करा

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. ६ :

गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन स्वीकृत करण्यात आलेला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली जिल्ह्यातील तब्बल तीन शासकीय गोडाऊन मध्ये स्वीकृत न करता परत करण्यात आल्याने निकृष्ठ तांदळाचा शासनास पुरवठा करणाऱ्या राईसमिल धारकांत चांगलीच खळबळ माजली आहे. दरम्यान जिल्ह्याच्या वेगवेगळ्या शासकीय गोदामात अस्वीकृत करण्यात आलेला तांदूळ देसाईगंजच्या आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये देसाईगंज तहसील कार्यालयातील गुणनियंत्रण अधिकाऱ्यांनी स्वीकृत केला असल्याने एकुणच गुणनियंत्रण अधिकाऱ्याच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह लावल्या जाऊ लागले असुन संबंधित राईसमिल धारकांस लाभ पोहचवण्याच्या हेतुने गुणनियंत्रण अधिकाऱ्याने तांदूळ स्वीकृत केला असल्याचे यामुळे स्पष्ट होत असल्याने संबंधित अधिकाऱ्यास तत्काळ निलंबित करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की देसाईगंज (वडसा)येथील आकाश अग्रवाल गोडाऊन येथुन दि.३० मे २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम अहेरी स्थित मोदुमडगु येथे वाहन क्रमांक एमएच-३४ एबी-३६५१ टिपी क्रमांक ३४३३०१ ने वजन २४७ क्विंटल तांदूळ,दि.३० मे २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम मुलचेरा येथे वाहन क्रमांक एमएच-३४ एबी-८२९२ ने आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज (वडसा)येथुन टिपी क्रमांक २१७-०९९ धान्याचे वजन २४६ क्विंटल ८० किलो तसेच दि.२ जुन २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम अहेरी स्थित मोदुमडगु येथे वाहन क्रमांक एमएच-३४ एबी-५२९५ टिपी क्रमांक २१७१०० धान्य वजन २४५ क्विंटल ६० किलो आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज (वडसा) चा तांदूळ संबंधित शासकीय गोदामातील गोदाम व्यवस्थापकांनी तपासला असता सदर तांदुळ अळ्यामिश्रीत,कणी व डस्ट युक्त आढळून आला असता मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे संबंधित गोदाम व्यवस्थापकांनी केलेल्या पंचनाम्यात नमुद करून तांदूळ अस्विकृत केला आहे.

देसाईगंज येथे शासकीय गोडाऊन रिकामे असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी गडचिरोली यांनी आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज (वडसा),पंकज मोटवाणी गोडाऊन कुरुड यांचे आवश्यकता नसतांना खाजगी गोडाऊन किरायाने घेऊन शासनाचा लाखो रुपयाचा नुकसान केला आहे.सदर गोडाऊन हे संबंधित राईसमिलच्या परिसरातीलच असुन नियमाप्रमाणे राईसमिलच्या परिसरातील खाजगी गोडाऊन किरायाने घेता येत नाही.असे असतांना आकाश अग्रवाल गोडाऊनचे संचालक आकाश अग्रवाल यांच्या परिवारातील सदस्यांच्या नावे मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज असे एकुण तीन सिएमआर मिलींग करणारे राईसमिल असुन पंकज मोटवाणी या गोडाऊन संचालकाचे नातेवाईक यांचे जय अम्बे राईसमिल कुरुड व माँ शारदा फुड प्रॉडक्ट कुरुड या नावाने दोन राईसमिल असतांना संबंधितांचे खाजगी गोडाऊन किरायाने घेतले आहेत.

दरम्यान आकाश अग्रवाल यांच्या गोडाऊन मधुन गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी व मुलचेरा येथील तीन शासकीय गोदामात पाठवण्यात आलेला तांदळाची गुणवत्ता तपासण्या करीता देसाईगंज तहसील कार्यालयातील गुणनियंत्रण अधिकारी यांचे नियुक्ती करण्यात आली असून त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी निरिक्षण अधिकारी युवराज निलकंठ बोरकर यांचेवर सोपविण्यात आली आहे. सदर तांदळाची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी असलेल्या पुरवठा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करून संबंधित राईसमिलर्स यांना लाभ पोहचवण्याचा प्रयत्न केला.